# इगतपुरी पंचायत समिती, इगतपुरी जिल्हा नाशिक या संस्थेचा
# सन २००७-२००८ या वित्तीय वर्षाचा लेखा परीक्षण अहवाल

जा.क्र.स्था/३/ब/जिप/पंस इगतपुरी/नाशिक/१२७९

उपमुख्य लेखा परीक्षक,
स्थानिक निधी लेखा, नाशिक
लेखाकोष भवन, तिसरा मजला,
जिल्हाधिकारी कार्यालय आवार,
नाशिक
दिनांकः- १३.४.२००९

**प्रेषक,**

उपमुख्य लेखा परीक्षक,
स्थानिक निधी लेखा, नाशिक

**प्रति,**

मा. मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, नाशिक

इगतपुरी पंचायत समिती, इगतपुरी जिल्हा नाशिक या संस्थेचे सन २००७-२००८ या वित्तीय वर्षाचे लेखा परीक्षण श्री. सं. वा. पारनेरकर, सहाय्यक लेखा परीक्षा अधिकारी, स्थानिक निधी लेखा, नाशिक यांनी दिनांक २४.११.२००८ ते १०.१२.२००८ या कालावधीत पूर्ण केले. सदर अहवालावर पुनर्विलोकन श्री. सु. ध. ठाकरे, प्रभारी लेखापरीक्षा अधिकारी यांनी दि. १२.१२.२००८ रोजी केले.

या अहवालावर चर्चा करुन अहवालाचे अंतिमीकरण श्री. वि. ए. कोते, उपमुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा, नाशिक यांनी दिनांक ३१.१२.२००८ रोजी केले.

लेखापरिक्षीत आर्थिक वर्षात खालीलप्रमाणे पदाधिकारी व अधिकारी या संस्थेचे कामकाज पहात होते.

**सभापती**

| | |
|---|---|
| श्री. कावजी गंगाराम ठाकरे | १.४.२००७ ते ३१.३.२००८ |

**गटविकास अधिकारी**

| | |
|---|---|
| श्री. बी. ए. बोटे | १.४.२००७ ते ८.५.२००७ |
| श्री. ए. बी. दोंदे | ९.५.२००७ ते २४.५.२००७ |
| श्री. बी. ए. बोटे | २५.५.२००७ ते ५.६.२००७ |
| श्री. एम. एस. सवादकर | ६.६.२००७ ते १०.९.२००७ |
| श्री. बी. टी. मोरे | ११.९.२००७ ते २३.९.२००७ |
| श्री. एम. एस. सवादकर | २४.९.२००७ ते २.१२.२००७ |
| श्री. ए. ई. बागुल | ३.१२.२००७ ते २८.१.२००८ |
| श्री. जी. बी. कटारे | २९.१.२००८ ते ३१.३.२००८ |

# भाग पहिला
## (मागील लेखा परीक्षण )

---

मागील लेखा परीक्षण अहवालातील खालील परिच्छेद थकीत असुन त्याबाबत मा. विभागीय आयुक्त, नाशिक विभाग, नाशिक यांचेकडे स्वतंत्र पत्र व्यवहार सुरु आहे.

| अ. क्र. | वर्ष | परिच्छेद क्रमांक | परि. संख्या |
|---|---|---|---|
| १ | १९७५-७६ | १२ | १ |
| २ | १९७८-७९ | १६,१८(ब)(अ.क्र.२,४,५)३३(अ) | ३ |
| ३ | १९७९-८० | ३५ | १ |
| ४ | १९८०-८१ | १२ | १ |
| ५ | १९८१-८२ | ४(अ,ब,क,ड),५(अ,ब,क,ड) | २ |
| ६ | १९८२-८३ | ७ | १ |
| ७ | १९८३-८४ | ३,५ | २ |
| ८ | १९८४-८५ | ४,५,६,८<br>पंचायत राज समिती लेखापरीक्षा पुनर्विलोकन अहवालात समाविष्ठ<br>परि.क्र.६:- अल्पबचत अनुदान लेखा (६.११२)<br>परि.क्र.८:- फांगुळगव्हाण पिण्याच्या पाण्याची विहीर दुरुस्ती कागदपत्रे उपलब्ध केले नाहीत. (६.३६) | ४ |
| ९ | १९८५-८६ | ४ | १ |
| १० | १९८६-८७-८८ | ५,८,२१ | ३ |
| ११ | १९८८-८९ | ७,१५ | २ |
| १२ | १९८९-९० | ६,२९ | २ |
| १३ | १९९०-९१ | ४<br>पंचायत राज समिती लेखापरीक्षा पुनर्विलोकन अहवालात समाविष्ठ<br>परि.क्र.४:- इलेक्ट्रीक मोटार खरेदीबाबत.(६.७७) | १ |
| १४ | १९९१-९२ | ५,६,९ | ३ |
| १५ | १९९३-९४ | ३,१२ | २ |
| १६ | १९९४-९५ | ४(१,२,३,४,५),६(१,२,३,४),१०(अ),१४(१,२,) | ४ |
| १७ | १९९५-९६ | ९(२) | १ |
| १८ | १९९६-९७ | ५ | १ |
| १९ | १९९७-९८ | १८,२४(१)<br>पंचायत राज समिती लेखापरीक्षा पुनर्विलोकन अहवालात समाविष्ठ<br>परि.क्र.१८:- अग्रीम नोंदवहीबाबत.(४.९३) | २ |

| | | | |
|---|---|---|---|
| २० | १९९८-९९ | ४,१९,२५<br>पंचायत राज समिती लेखापरीक्षा पुनर्विलोकन अहवालात समाविष्ठ<br>परि.क्र.२५:- अपुर्ण बांधकामाबाबत. (४.१०९) | ३ |
| २१ | ९९-२००० | २१,२७<br>पंचायत राज समिती लेखापरीक्षा पुनर्विलोकन अहवालात समाविष्ठ<br>परि.क्र.२१:- प्रलंबित अग्रीम रकमेबाबत. ४.१०५(१५)<br>परि.क्र.२७:- अपुर्ण बांधकामाबाबत. ४.१०२(२४) | २ |
| २२ | २००१-२००२ | ४,९,१५,१९<br>पंचायत राज समिती लेखापरीक्षा पुनर्विलोकन अहवालात समाविष्ठ<br>परि.क्र.४: पं.स.सेस मधून करण्यात आलेल्या रस्ता दुरुस्ती खर्चाबाबत. ४.३१<br>परि.क्र.१५: थकीत अग्रीम रक्कमांबाबत. ४.२५०(६)<br>परि.क्र.१९: पं.स.स्तरावरील अपुर्ण कामांबाबत. ४.२४७(९) | ४ |
| २३ | २००२-२००३ | १३,१८<br>पंचायत राज समिती लेखापरीक्षा पुनर्विलोकन अहवालात समाविष्ठ<br>परि.क्र.१३:- पोहोच पावत्या उपलब्ध न केलेबाबत. (४.२०६)(९)<br>परि.क्र.१८:- पोहोच पावत्या उपलब्ध न केलेबाबत.(४.२०६)(९) | २ |
| २४ | २००३-२००४ | ५,१०(४ व ६),१७,२१,२२,२४,२६<br>पंचायत राज समिती लेखापरीक्षा पुनर्विलोकन अहवालात समाविष्ठ<br>परि.क्र.२४ :- थकीत अग्रीम रक्कमांबाबत. (४.२०१(५) | ७ |
| २५ | २००४-२००५ | ३,४,५,६,७,९,१०,१४,१६,<br>पंचायत राज समिती लेखापरीक्षा पुनर्विलोकन अहवालात समाविष्ठ<br>परि. क्र. ५ :- एकात्मिक बालविकास सेवा योजना खरेदी करण्यात आलेल्या लोखंडी पेटया खरेदीबाबत (४.३१४)<br>परि. क्र. १६ :- अपूर्ण बांधकामांबाबत. (४.३३२) | ९ |
| २६ | २००५-२००६ | ३,६,१४,१७,१८,२०,२१,२५,२६,२७,२८,३३,३४,३५,३७<br>पंचायत राज समिती लेखापरीक्षा पुनर्विलोकन अहवालात समाविष्ठ<br>परि.क्र. ३ :- ५०% अनुदानाने शेतक-यांना ताडपत्री वाटपयोजना (४.२३६)<br>परि.क्र.१८:- थकीत अग्रीम रक्कम वसूलीबाबत (४.७३१(१८))<br>परि.क्र.३३ :- अपूर्ण बांधकामाबाबत (४.७२८(३२)) | १५ |
| **सन २००६-२००७** | | | |
| परिच्छेद क्रमांक ४ :- तालुका मास्तर इगतपुरी यांनी दिनांक ३०.१०.२००७ रोजी मध्यवर्ती सहकारी बँकेकडे भरणा केलेल्या कथित अखर्चित रक्कमांबाबत. (पंरास प्रस्तावित) | | | |
| परिच्छेद क्रमांक ५ :- रजा प्रवास सवलत देयकांबाबत. | | | |
| परिच्छेद क्रमांक ६ :- वाहन क्रमांक एम.एच.-१५ अेअे ५०२४ बाबत. | | | |

| |
|---|
| परिच्छेद क्रमांक ७ :- पंचायत समिती इगतपुरीचे वाहन क्रमांक एम.एच.-१५ अेअे ५०७३ च्या कार्यक्षेत्राबाहेरील प्रवासाबाबत. |
| परिच्छेद क्रमांक ८ :- वाहनाचा कार्यक्षेत्राबाहेर वापर केल्याबाबत. |
| परिच्छेद क्रमांक ९ :- व्यवसायकर कमी कपात केलेबाबत. |
| परिच्छेद क्रमांक १० :- वसुल रक्कमा जमा नसलेबाबत. |
| परिच्छेद क्रमांक ११ :- निवासस्थान अनुज्ञप्ती शुल्क वसुलीबाबत. |
| परिच्छेद क्रमांक १२ :- जिल्हा निधी ताळमेळाबाबत. (पंरास प्रस्तावित) |
| परिच्छेद क्रमांक १३ :- मुदतबाहय धनादेश रद्य न केलेबाबत. |
| परिच्छेद क्रमांक १४ :- प्रदान न केलेल्या धनादेशाबाबत. |
| परिच्छेद क्रमांक १४ (अ) :- किरकोळ रोखवहीत गोषवारा नसलेबाबत. |
| परिच्छेद क्रमांक १५ :- प्रमाणकांशिवाय नोंदविलेला खर्च (पंरास प्रस्तावित) |
| परिच्छेद क्रमांक १६:- भविष्य निर्वाह निधी रक्कमा प्रदानातील अनियमिततांबाबत. |
| परिच्छेद क्रमांक १७ :- प्रमाणके / पोहोच पावत्या नसलेबाबत. |
| परिच्छेद क्रमांक १८ :- अनुदान वाटपाबाबत ग्रामपंचायतींच्या पोहोच पावत्या नसलेबाबत. |
| परिच्छेद क्रमांक १९:- प्राधिकार पत्रान्वये केलेल्या प्रदानाबाबत. |
| परिच्छेद क्रमांक २० :- ए.बा.वि.से.यो.वि.रोखवही अपूर्ण असणे व इतर अनियमिततांबाबत. (पंरास प्रस्तावित) |
| परिच्छेद क्रमांक २१ :- कर्मचा-यांना मासिक वेतन व भत्त्याचे प्रदान बँकेमार्फत करण्याच्या कार्यपध्दतीबाबत. |
| परिच्छेद क्रमांक २३ :- थकीत अग्रीम रक्कमांचे पडताळणीसाठी अग्रीम नोंदवही उपलब्ध न झालेबाबत. |
| परिच्छेद क्रमांक २४ :- अनामत नोंदवही लेखापरीक्षणास उपलब्ध न झालेबाबत. |
| परिच्छेद क्रमांक २५ :- विस्तार अधिकारी व ग्रामसेवक यांच्या विलंबाने सादर झालेल्या दैनंदिन्यांबाबत, व दप्तर तपासणी अहवालाबाबत. |
| परिच्छेद क्रमांक २६ :- सं.ग्रा.रो.यो. अंतर्गत नेमलेल्या उपलेखापालांचे ग्रामपंचायत दप्तर तपासणीचे उददीष्टपूर्तीबाबत. |
| परिच्छेद क्रमांक २७:- सेवापुस्तकातील अनियमितता. |
| परिच्छेद क्रमांक २८:- बांधकाम उपविभागाकडील अपूर्ण रस्ते नोंदवहीबाबत. (नं.४०) |
| परिच्छेद क्रमांक २९ :- लघुपाटबंधारे विभागाकडील न.नं.४१ मध्ये जमीनीच्या नोंदी अपूर्ण असलेबाबत.... |
| परिच्छेद क्रमांक ३०:- लघुपाटबंधारे उप विभागाकडील अपूर्ण मालमत्ता नोंदवहीबाबत. |
| परिच्छेद क्रमांक ३१ :- इगतपुरी पंचायत समिती अंतर्गत शासनाच्या अनुदानातून बांधलेल्या निवासस्थानाबाबत व मालमत्ता नोंदवहीतील इतर नोंदींबाबत. |
| परिच्छेद क्रमांक ३२ :- जवाहर रोजगार योजना विहिरींसाठी अनुदान देतांना झालेल्या अनियमिततांबाबत. |
| परिच्छेद क्रमांक ३३ :- अपूर्ण जवाहर विहिरींबाबत. (पंरास प्रस्तावित) |
| परिच्छेद क्रमांक ३४ :- अपूर्ण विहिरींबाबत (कृषी विभाग) (पंरास प्रस्तावित) |

| |
|---|
| परिच्छेद क्रमांक ३५ :- हातपंप विजपंप वर्गणी थकबाकीबाबत. (पंरास प्रस्तावित) |
| परिच्छेद क्रमांक ३६ :- लेखापरिक्षणास उपलब्ध न झालेल्या दप्तराबाबत. (पंरास प्रस्तावित) |
| परिच्छेद क्रमांक ३७ :- अभिकरण योजना वार्षिक लेख्यांबाबत.(नंबर २१) |

**टिप :-** उपरोक्त नमुद केलेल्या आक्षेपांचे संदर्भात त्या त्या वर्षाच्या पुढील अभिप्रायात नमुद केलेले आक्षेप क्रमांकच अंतीम समजण्यात यावेत.

## भाग दुसरा
## (चालु लेखा परीक्षण )

---

## मुंबई स्थानिक निधी लेखा परीक्षा अधिनियम १९३० चे कलम ९ ( अ ) खालील अनियमितता.

जे प्रदान वैधानिक तरतुदी विरुध्द करण्यात आले आहे असे प्रदान.

---

### परिच्छेद क्रमांक १ :- १२ वा वित्त आयोगाचे निधीतून पंचायत समिती सभागृह दुरुस्त करणेतील अनियमितता.

पंचायत समिती इगतपुरी यांनी सन २००७ – २००८ या वित्तीय वर्षात १२ वा वित्त आयोगातून पंचायत समिती कार्यालयातील सभागृह दुरुस्तीसाठी रक्कम रुपये ५०,०००/- एवढा खर्च नोंदविलेला आहे.

या संदर्भात खालील अभिप्राय देण्यात येत आहे.

महाराष्ट्र शासन, शासन निर्णय क्रमांक बाविआ/२००५/प्र.क्र.३९०/वित्त – ४, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई ४०००३२, दिनांक ३ डिसेंबर, २००५ अन्वये पंचायत समितीने १२ वा वित्त आयोगांतर्गत प्राप्त होणा-या निधीतून घ्यावयाचे कामाचे यादीत पंचायत समिती कार्यालय दुरुस्तीबाबत कुठेही तरतुद नाही. त्यामुळे पंचायत समितीचे सक्षम अधिकारी व पदाधिकारी यांनी १२ वा वित्त आयोगातून केलेला खर्च नियमबाह्य आहे. या संदर्भात जबाबदारी निश्चित करुन खर्च रक्कम रुपये ५०,०००/- वसूली करावी अथवा शासनाने क्षमापन घेऊन अनुपालन दर्शवावे.

---

### परिच्छेद क्रमांक २ :- पंचायत समिती उपकरातून (५०% अनुदानावर) खरेदी केलेल्या ताडपत्रीबाबत

प्रमाणक क्रमांक ४ दिनांक ३१.३.२००८ अन्वये रुपये ४३,५८४/- इतका खर्च पंचायत समिती, इगतपुरी यांनी ताडपत्री खरेदीकरीता केलेला आहे. त्यावर खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत:

१) महाराष्ट्र जिल्हा परिषद, लेखा संहिता १९६८ मधील नियम क्रमांक ८३(३) नुसार प्राप्त वस्तुंचा दर्जा व गुणवत्ता या संदर्भात गटविकास अधिकारी यांनी दाखला दिलेला नाही.

२) सदरची योजना ५०% लाभार्थी सहभागावर राबवावयाची आहे. एकूण २७ लाभार्थ्यांना या योजनेचा लाभ दिला असून रुपये १,६१५/- दराने रुपये ४३,६०५/- लाभार्थी हिस्सा योजनेचा लाभ देण्यापूर्वी गोळा करुन जिल्हा परिषद निधित जमा करणे आवश्यक होते. महाराष्ट्र जिल्हा परिषद, लेखा संहिता १९६९ निर्णय क्र. ५०(४) व ग्रामविकास विभाग परिपत्रक

क्र. १०८४/सीआर/१६३३/५७ दिनांक १०.१.१९८५ अन्वये लाभार्थ्यांना लाभ देण्यापूर्वी लोकसहभाग रक्कम वसुल करणे आवश्यक आहे. तशी कार्यवाही झाली नाही. याबाबत शासनाचे क्षमापन घ्यावे.

४) ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्र. मागास १०९३/प्र.क्र.१२३९/ दिनांक १.९.१९९३ अन्वये ज्या वित्तिय वर्षात साहित्य खरेदी केले आहे त्याच वर्षात त्याचे वाटप होणे आवश्यक आहे, मात्र तशी कार्यवाही झाली नाही. साहित्याचे वाटप माहे मार्च २००७ नंतर झाल्याने योजना राबविण्याचा उद्देश सफल झालेला नाही. याबाबत पंचायत समिती सभेचे क्षमापन घ्यावे.

५) लाभार्थ्यांचे प्रकरणे तपासणी केली असता खालीलप्रमाणे उणिवा आढळून आल्यात.

| अ.क्र. | लाभार्थ्यांचे नांव | अनियमितता |
|---|---|---|
| १ | श्री. सुखदेव शंकर टोचे | ७/१२ उता-यावर उसाच्या पिकाची नोंद असून सदरचा दाखला दि. २३.८.२००८ रोजी घेण्यात आलेला आहे. |
| २ | श्री. नवसु रावजी लचके | ७/१२ उता-यावर नाचणी, खुरसणी, कुळीद, गवत अशा नोंदी आहेत. |
| ३ | श्री. बजु नाना मुतडक | ७/१२ उता-यावर ऊस, वांगे, टोमॅटो, मिरची अशा नोंदी आहेत. सदरचा दाखला दि. २८.७.२००८ रोजी घेण्यात आलेला आहे. |
| ४ | श्री. भगवंत बाबुराव झनकर | प्रस्ताव तसेच ७/१२ उता-यावर संबंधीत लाभार्थ्याचे नांवे ८.१२ हेक्टर जमिन आहे. |

सदर योजनेबाबत दिनांक १३.२.२००८ च्या पंचायत समिती सभेत ठराव क्रमांक २३ नुसार मंजुरी घेण्यात आलेली असून, त्यामध्ये तालुक्यातील शेतक-यांना जास्तीत जास्त ६ हेक्टरपर्यंत जमिन धारण करणारे शेतकरी तसेच भात पिकविणा-या शेतक-यांना पिकाची काढणी, मळणी, वाहतुक, साठवणी अगर पावसापासून धान्याचे संरक्षण करण्यासाठी ताडपत्री पुरविण्याची योजना घेण्यात आलेली होती. परंतु उपरोक्त दर्शविलेले ४ लाभार्थी सदर योजनेतील अटी नुसार पात्र नसल्याने संबंधीतांना अदा ४ ताडपत्रींची रक्कम प्रति ताडपत्री रुपये १,४३५ प्रमाणे रुपये ५,७४० वसुल करुन योग्य त्या लेखाशिर्षाखाली भरणा करण्यात यावी.

उपरोक्त अनियमिततांमुळे निर्देशित पूर्तता होईपर्यंत रुपये ४३,५८४/- इतका खर्च लेखापरीक्षणात आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.

वसुलपात्र रक्कम रुपये ५,७४०/-
आक्षेपाधिन रक्कम रुपये ४३,५८४/-
पंचायत समिती सेस

## मुंबई स्थानिक निधी लेखा परीक्षा अधिनियम १९३० चे कलम ९ ( ब ) खालील अनियमितता.

कोणत्याही व्यक्तींच्या अक्षम्य हयगयीमुळे किंवा गैरवर्तणुकीमुळे झालेले नुकसान

**परिच्छेद क्रमांक ३ :- अनामत खाती रक्कम जमा नसतांना अनामत परतावा मंजूर करुन केलेल्या प्रदानाबाबत.**

पंचायत समिती इगतपुरी यांनी श्री. मुरलीधर मधुकर हांडोरे यांना प्रमाणक क्रमांक ९ दिनांक २.१.२००८ रक्कम रुपये ४२,०००/- मध्ये रुपये १०,०००/- व प्रमाणक क्रमांक ३८ दिनांक ३.१.२००८ अन्वये रुपये १०,०००/- असे एकूण रुपये २०,०००/- समाजकल्याण घरकुल अनुदानापोटी प्रदान केले आहेत.

प्रत्यक्षात अनामत नोंदवहीची पडताळणी केली असता श्री. मुरलीधर मधुकर हांडोरे यांना प्रदान करावयाची रक्कम प्राप्तच झालेली नसून ती ठेव सदरी जमा नसतांनाच ठेव परतावा देयकाद्वारे प्रदान करण्यात आलेली आहे.

महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता १९६८ चा नियम २१७ नुसार ठेव नोंदवहीमधील नोंदीनुसार ठेव थकीत आहे याची खात्री करुन घेतल्यानंतरच गटविकास अधिकारी यांनी ठेव परताव्यासाठी मान्यता द्यावी अशी स्पष्ट तरतुद असतांनाही ठेव सदरी जमा नसलेल्या रक्कमा प्रदान करणे ही गंभीर अनियमितता आहे.

या अनियमिततेबाबत संबंधितांवर जबाबदारी निश्चित करुन प्रशासकीय कारवाईअंती प्रदान रक्कम रुपये २०,०००/- वसूल करावेत व सदर अनियमिततेस मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे क्षमापन घेऊन पुर्तता लेखापरीक्षणास दर्शवावी.

वसुलपात्र रक्कम रुपये २०,०००/-
पंचायत समिती इगतपुरी

---

**परिच्छेद क्रमांक ४ :- ठेव खाती जमा केलेल्या रक्कमेपेक्षा जादा रक्कम प्रदान केल्याबाबत.**

पंचायत समिती इगतपुरी यांचेकडील अनामत नोंदवही नमुना नंबर ७१ ची पडताळणी केली असता दुधाळ जनावर लाभार्थी हिस्सा रक्कम ठेव सदरी जमा घेऊन त्याचे प्रदान करतांना रक्कम रुपये २४,०००/- जमा रक्कमेपेक्षा जादा प्रदान करण्यात आले आहेत. त्या विषयीचा तपशील खालीलप्रमाणे –

| अ.क्र. | चलन क्रमांक | दिनांक | रक्कम रुपये |
|---|---|---|---|
| १ | २ | २.१.२००८ | २,६४,००० |
| २ | १० | ७.१.२००८ | २४,००० |
| ३ | ११ | ९.१.२००८ | २४,००० |
| ४ | १३ | ९.१.२००८ | १,२०,००० |
| ५ | ३५ | २९.१.२००८ | ९६,००० |
| ६ | ६ | १३.२.२००८ | ८,००० |
| ७ | ७ | १३.२.२००८ | २४,००० |
| ८ | ८ | १८.२.२००८ | २४,००० |

| | | | |
|---|---|---|---|
| ९ | १४ | २७.२.२००८ | २४,००० |
| १० | ६ | १०.३.२००८ | ८,००० |
| ११ | ८ | १४.३.२००८ | ८,००० |
| १२ | ९ | १४.३.२००८ | ८,००० |
| १३ | १० | १४.३.२००८ | ८,००० |
| १४ | ११ | १४.३.२००८ | ८,००० |
| १५ | १२ | १४.३.२००८ | ८,००० |
| १६ | १३ | १४.३.२००८ | ८,००० |
| १७ | १४ | १४.३.२००८ | ८,००० |
| १८ | १५ | १४.३.२००८ | ८,००० |
| १९ | १६ | १४.३.२००८ | ८,००० |
| २० | १७ | १४.३.२००८ | ८,००० |
| २१ | १८ | १४.३.२००८ | ८,००० |
| २२ | १९ | १४.३.२००८ | ८,००० |
| २३ | ३८ | २४.३.२००८ | २४,००० |
| २४ | ५३ | २६.३.२००८ | २४,००० |
| २५ | ५४ | २६.३.२००८ | २४,००० |
| २६ | ५५ | ३१.३.२००८ | २४,००० |
| | **एकूण जमा रक्कम रुपये** | | ७,९२,००० |

उपरोक्त जमा रक्कमेतून खालीलप्रमाणे परतावा प्रदान करण्यात आलेला आहे.

| प्रमाणक क्रमांक | दिनांक | रक्कम रुपये |
|---|---|---|
| ३० | २३.१.२००८ | ३,३६,००० |
| २० | २७.२.२००८ | १,९२,००० |
| ५७ | २४.३.२००८ | ९६,००० |
| २० | २४.३.२००८ | १,२०,००० |
| ५१ | ३१.३.२००८ | ७२,००० |
| | **एकूण** | **८,१६,०००** |

उपरोक्त तपशिलानुसर एकूण जमा रक्कम रुपये ७,९२,०००/- असतांना ठेव परतावा देयकांद्वारे एकूण रक्कम रुपये ८,१६,०००/- प्रदान करण्यात आली आहे. ती रुपये २४,०००/- ने जादा आहे.

सदर जादा प्रदान रक्कम रुपये २४,०००/- वसूल करुन ठेव सदरी जमा करावेत. सदर अनियमिततेबाबत जबाबदारी निश्चित करुन सदर बाब आर्थिक गैरव्यवहारासंबंधित आहे किंवा कसे या अनुषंगाने चौकशीसह उचित प्रशासकीय कारवाईअंती मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे क्षमापन घेऊन पुर्तता लेखापरीक्षणास दर्शवावी.

वसुलपात्र रक्कम रुपये २४,०००/-

**<u>परिच्छेद क्रमांक ५ :- वाहनाचा कार्यक्षेत्राबाहेर वापराबाबत.</u>**

अ) सन २००७ – २००८ चे लेखापरीक्षणाचेवेळी पंचायत समिती इगतपुरी अंतर्गत प्राथमिक आरोग्य केंद्र, बेलगांव कु-हे येथील वाहन क्र. एम.एच.१५/एबी ५०१० च्या वाहनलेख्यांची पडताळणी करण्यात आली. लेखापरीक्षण वर्षात वाहन कार्यक्षेत्राबाहेर वापरले असून त्याची माहिती खालीलप्रमाणे आहे.

| दिनांक | कोठे | कि.मि. | तपशिल |
|---|---|---|---|
| १६.४.२००७ | नाशिक | ९३ | कार्यालयीन कामकाज |
| २४.८.२००७ | नाशिक | १०८ | ---,,,--- |
| ३१.८.२००७ | नाशिक | १३३ | ---,,,--- |
| ३.९.२००७ | नाशिक | ६९ | ---,,,--- |
| ३.१२.२००७ | नाशिक | ७३ | ---,,,--- |
| | **एकूण** | **४७६** | |

ब) सन २००७ – २००८ चे लेखापरीक्षणाचेवेळी पंचायत समिती इगतपुरी येथील वाहन क्र. एम.एच.१५/ए.ए.५०७३ च्या वाहनलेख्यांची पडताळणी करण्यात आली. लेखापरीक्षण वर्षात वाहन कार्यक्षेत्राबाहेर वापरले असून त्याची माहिती खालीलप्रमाणे आहे.

| दिनांक | कोठे | कि.मि. | तपशिल |
|---|---|---|---|
| ७.४.२००७ | नाशिक | १६६ | मा. मु.का.अ. यांचेशी चर्चेकामी |
| २२.६.२००७ | नाशिक | १०२ | मा. आयुक्त कार्यालय, सुनावणीकामी |
| १७.७.२००७ | नाशिक | १०७ | समन्वय सभेस हजर |
| १९.७.२००७ | नाशिक | १०२ | मा. आयुक्त कार्यालय, सुनावणीकामी |
| | **एकूण** | **४७७** | |

शासन निर्णय ग्रामविकास विभाग क्र. जेईपी/२४६९/१७७०३/डी-१/ दिनांक १४.११.१९६९ अन्वये वाहनाचा कार्यक्षेत्राबाहेर वापर करण्यापूर्वी मुख्य कार्यकारी अधिकारी यांची पूर्व परवानगी घेणे आवश्यक आहे. मात्र तशी कार्यवाही झालेली नाही. तसेच शासन निर्णय ग्रा.वि.वि.क्र. जेईपी/१०/सीआर/५९/००/०५ दिनांक २४.४.२००० अन्वये पूर्वपरवानगी शिवाय त्यांचे वापरातील वाहन कार्यक्षेत्राबाहेर वापरल्यास कार्योत्तर मंजूरी अनुज्ञेय नाही.

त्यामुळे शासन निर्णय, वित्त विभाग क्र.प्रवास/१००५/प्रक्र-३३/सेवा-५/ दि.८.७.१९९५ नुसार कार्यक्षेत्राबाहेरील प्रवासाचे एकूण किलोमीटर अनुक्रमे ४७६ व ४७७ कि.मी. साठी रुपये ८/- प्रति कि.मी. प्रमाणे संबंधितांकडून अनुक्रमे रुपये ३,८०८/- व रुपये ३,८१६/- वसुल करुन अनुपालन दर्शवावे.

वसुलपात्र रक्कम अ) रुपये ३,८०८/-
ब) <u>रुपये ३,८१६/-</u>
एकूण वसूलपात्र रक्कम रुपये ७,६२४/-

**परिच्छेद क्रमांक ६ :- इगतपुरी ते आवळखेड रस्ता दुरुस्ती करणे.**

| | |
|---|---|
| प्रशासकीय मान्यता | पंचायत समिती ठराव क्र. १८३ दिनांक १२.१२.२००६ अन्वये |
| तांत्रिक मान्यता | सहा. अभियंता इगतपुरी तां.मा.१८० दि. ९.२.२००७ अन्वये रुपये ५०,०००/- |
| निविदा प्रकार | बी – १ |
| मक्तेदार | चेअरमन विनायक मजूर सहकारी संस्था, साकुर ता.इगतपुरी |
| कामाची मुदत | २ महिने |
| कामाचे आदेश | बांध/उप.अ./इगतपुरी/निविदा/१ दिनांक १८.४.२००७ |
| काम पूर्णत्वाचा दिनांक | १४.६.२००७ |
| मोजमाप पुस्तिका | ३६१ पृष्ठ क्रमांक ८३ ते ८४ |
| अंतिम देयक क्र., दि., रक्कम | प्र.क्र.२५/३१.१२.२००७/रुपये ५०,०००/- |

या कामाचे बाबतीत खालील अभिप्राय देण्यात येत आहे.

१) उपरोक्त कामाचे अंदाजपत्रकात गौण खनिज ६५.६१ घ.मी.ची तरतुद केलेली आहे प्रत्यक्षात ६७.६१ घ.मी. माती भ्राव केलेला आहे. व मक्तेदारास अंतिम देयकाला प्रति घनमीटर ३५.३४ प्रमाणे रक्कम प्रदान केलेली आहे. परंतु देयकातून रक्कम रुपये २३८२.७६ कपात करुन शासनाकडे भरणा केलेली नाही. संबंधित मक्तेदाराकडून रक्कम वसूल करुन शासकीय सदरी भरणा करुन अनुपालन दर्शवावे.

२) महाराष्ट्र शासन परिपत्रक क्रमांक २८.९.२००५ नुसार मक्तेदाराकडून कामाच्या किमतीच्या ४% कार्यकंत्राट कर वसूल करणे क्रमप्राप्त ठरते. परंतु अंतिम देयक प्रदान करतांना कपातीची कार्यवाही करण्यात आलेली नाही. आता रुपये ५०,०००/- या प्रदान रक्कमेवर रुपये २,०००/- कार्यकंत्राट कर संबंधित मक्तेदाराकडून वसूल करुन शासनाकडे भरणा करुन पुर्तता दर्शवावी.

लेखाशिर्ष<br>
वाढीव उपकर<br>
गौण खनिज रुपये २,३८२.७६<br>
कार्यकंत्राट कर रुपये २,०००.००<br>
एकूण रक्कम रुपये ४,३८२.७६

---

**परिच्छेद क्रमांक ७ :- वाकी ते आळवंड रस्ता दुरुस्ती.**

| | |
|---|---|
| प्रशासकीय मान्यता | पंचायत समिती ठराव क्र. १८३ दिनांक १२.१२.२००६ अन्वये रुपये ५०,०००/-<br>सुधारीत – पंचायत समिती ठराव क्र. १७ दि. १४.१२.२००७ |

| | |
|---|---|
| तांत्रिक मान्यता | सहा. अभियंता (श्रेणी – १), जि.प.(इवद) उपविभाग इगतपुरी तां.मा.१८१ दि. ९.२.२००७ अंदाजपत्रकीय रक्कम रुपये ४९,९२९/- |
| निविदा प्रकार | बी – १ |
| मक्तेदार | चेअरमन विनायक मजूर सहकारी संस्था, साकुर ता.इगतपुरी |
| कामाची मुदत | २ महिने |
| कामाचे आदेश | बांध/उप.अ./इगतपुरी/निविदा/२ दिनांक १८.४.२००७ |
| काम पूर्णत्वाचा दिनांक | १४.६.२००७ |
| मोजमाप पुस्तिका | ३८१ पृष्ठ क्रमांक ८५ ते ८६ |
| अंतिम देयक क्र., दि., रक्कम | प्र.क्र.२६/३१.१२.२००७/रुपये ५०,०००/- |

या कामाचे बाबतीत खालील अभिप्राय देण्यात येत आहे.

१) उपरोक्त कामाचे अंदाजपत्रकात गौण खनिज शुल्काची तरतुद केलेली आहे. तथापि मक्तेदाराचे देयकातून ८४.२४ घ.मी. × दर ३५.३४ प्रमाणे रुपये २९७७.८४ कपात केलेली नाही. मक्तेदाराच्या अनामत रक्कमेतून सदरची रक्कम वसूल करुन शासन सदरी भरणा करुन अनुपालन दर्शवावे.

२) महाराष्ट्र शासन, राजपत्र दिनांक २९.८.२००५ नुसार मक्तेदाराकडून ४% कार्यकंत्राट कर वसूल करावयाचा आहे. तथापि मक्तेदाराच्या अंतिम देयकातून रुपये ५०,०००/- खर्चावर रुपये २,०००/- कार्यकंत्राट कर वसूल केलेला नाही. तो वसूल करुन शासन सदरी भरणा करुन अनुपालन दर्शवावे.

लेखाशिर्ष
वाढीव उपकर
गौण खनिज रुपये २,९७८/-
कार्यकंत्राट कर रुपये २,०००/-
एकूण रक्कम रुपये ४,९७८/-

---

## परिच्छेद क्रमांक ८ :- गौण खनिज स्वामित्व धनाची रक्कम अंतिम देयकातून कपात न करणेबाबत.

पंचायत समिती इगतपुरी यांना प्राप्त झालेल्या १२ व्या वित्त आयोगाचे अनुदानातून तालुक्यातील विविध रस्ता दुरुस्ती, शाळा खोली दुरुस्ती इत्यादी कामे बांधकाम उप – विभागाने पूर्ण केलेली आहेत. सदरच्या कामांचे लेखापरीक्षण केले असता उपविभागाने अंदाजपत्रके तयार करतांना गौण खनिज (घ.मी.) व त्यास दरसूचीनुसार अनुज्ञेय दर लावून व गणिती पध्दतीने होणा-या रक्कमेची परिगणना करुन अंदाजपत्रकात तरतुद केलेली आहे व मक्तेदाराने देखील निविदा बी – १ नुसार निविदा भरुन त्यानुसार काम केलेले आहे. मोजमाप पुस्तिकात व देयकात प्रत्यक्ष वापरण्यात आलेल्या गौण खनिजाचा हिशोब नमुद केलेला आहे.

पंचायत समितीने अंतिम देयक पारीत करतांना महाराष्ट्र शासन, महसूल व वनविभाग शासन निर्णय महसूल व वनविभाग क्र. गौखनि/१०/०२०६/प्र.क्र.५७/ख/ मंत्रालय, मुंबई ३२ दिनांक १५.१२.२००६ नुसार गौण खनिज खनिजाच्या स्वामित्व धनाची रक्कम रुपये २१,९४६/- या अहवालासोबत जोडण्यात आलेल्या परिशिष्ठ " १ " मध्ये नमुद केल्यानुसार अंतिम देयकातून कपात करण्यात आलेली सदरच्या कामांचे अंदाजपत्रक मोजमाप पुस्तिका व देयकात नमुद करुनही वसूल का केली नाही. कामाचे यादीनुसार संबंधित मक्तेदाराकडून रक्कम वसूल करुन शासनाकडे भरणा करुन पुर्तता दर्शवावी.

लेखाशिर्ष
१२ वा वित्त आयोग
वसूलपात्र रक्कम रुपये २१,९४६/-

---

**परिच्छेद क्रमांक ९ :- विद्युत देयकातील विज शुल्क रक्कमेच्या प्रदानाबाबत.**

पंचायत समिती इगतपुरी यांनी प्रमाणक क्रमांक ९६ दिनांक २६.१०.२००७ नुसार रक्कम रुपये ४,६९०/- मध्ये पंचायत समिती कार्यालय विद्युत देयक रुपये ३,९६०/- व मिटींग हॉल विद्युत देयक रुपये ७००/- चे प्रदान केले आहे. सदर विद्युत देयकात रुपये ४४१/- व रुपये ७७/- असे एकूण रुपये ५१८/- इतक्या रक्कमेची विज शुल्क आकारणी करण्यात आलेली आहे.

महाराष्ट्र आकस्मिक खर्च नियम १९६५ चा नियम १४७ टिप ३ नुसार विज देयकाचे प्रदान करतांना सदर देयकांत विज शुल्काचा समावेश करण्यांत आलेला नसल्याबाबत प्रमाणपत्र नमुद करणे आवश्यक आहे.

शासकीय कार्यालयांना विज शुल्क आकारणीपासून सूट देण्यात आलेली असल्याने रुपये ५१८/- प्रदान नियमबाह्य आहे.

तरी उपरोक्त नियमबाह्य विजशुल्क आकारणी बंद करणेबाबत विद्युत मंडळाशी संपर्क साधून विजशुल्क आकारणी बंद करुन घेऊन तसेच कार्यालयाच्या इतर विभागांकडील विद्युत देयकांत विज शुल्क आकारणी होत नसल्याची खात्री करुन तसे प्रमाणित करुन पुर्तता लेखापरीक्षणास दर्शवावी.

वसुलपात्र रक्कम रुपये ५१८/-

---

**परिच्छेद क्रमांक १० :- व्यवसाय कर कमी कपात केलेबाबत.**

पंचायत समिती, इगतपुरीमधील सन २००७-०८ मधील माहे सप्टेंबर महिन्यातील जिल्हानिधी प्रमाणक क्रमांक २८ (ए) दिनांक ७.९.२००७ अन्वये श्री. गजानन शंकर घावट, प्राथमिक शिक्षक यांना प्राथमिक शिक्षकाची वेतनश्रेणी लागू झाल्यानंतर शिक्षण सेवकाच्या कालावधीतील फरक रक्कम रुपये १,८९,००८/- अदा केलेला आहे. परंतु सदर कालावधीतील ज्या महिन्यातील एकूण वेतन रुपये १०,०००/- पेक्षा जास्त होते त्या महिन्यांसाठी महाराष्ट्र शासनाचे दिनांक २८.४.२००० चे राजपत्रानुसार रुपये २००/- व माहे फेब्रुवारी देय मार्चचे वेतनातून रुपये ३००/- प्रमाणे व्यवसाय करापोटी रक्कम कपात करणेबाबत निर्देशित

केलेले आहे, परंतु तशी कपात न केल्याने रक्कम रुपये २२५/- जादा अदा झालेले आहेत. सदरची रक्कम संबंधीताकडून वसुल करुन योग्य त्या लेखाशिर्षाखाली जमा करावे व तसे अनुपालन लेखापरीक्षणास दाखवावे.

वसुलपात्र रक्कम रुपये २२५/-

---

**परिच्छेद क्रमांक ११ :- रोख रक्कम हाताळण्याबाबत प्रदान करण्यात आलेल्या विशेष वेतनाबाबत.**

पंचायत समिती इगतपुरी यांचेकडील प्रमाणक क्रमांक १५ दि. १४.३.२००८ नुसार रक्कम रुपये १२,८००/- मध्ये लघुपाटबंधारे विभागाकडील कर्मचारी श्री. केशव गोपीनाथ गडाख यांना रुपये १५०/- रोख रक्कम हाताळण्याबाबत विशेष वेतन प्रदान करण्यात आलेले आहे.

शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक वेतन १२९८/प्र.क्र.१६/९८/सेवा-३, दिनांक २३.१२.१९९८ नुसार रोख रक्कमेच्या प्रमाणात विशेष वेतन निश्चित करण्यात आले असून शासन निर्णय क्रमांक एस.एस.पी.-१२८८/५७८/सेवा-१० दिनांक १७.१०.१९८८ मधील परिच्छेद २(७) नुसार रोख रक्कम हाताळण्याबाबत विशेष वेतन मंजूर करतांना दरवर्षी आर्थिक व्यवहारांचे पुनर्विलोकन करणे आवश्यक आहे.

शासन निर्णय दिनांक २९.८.२००५ नुसार सर्व कर्मचा-यांचे वेतन व भत्ते बँकेमार्फत प्रदान करण्यात येत आहेत. त्यामुळे रोख स्वरुपात संवितरणाचे काम मोठ्या प्रमाणावर कमी झाले आहे. त्यानुसार श्री. गडाख यांना विशेष वेतन प्रदान करतांना दरमहा आर्थिक रक्कमेच्या व्यवहारांबाबत पुनर्विलोकन करणे आवश्यक होते.

तथापि पंचायत समितीने याबाबत उपरोक्त शासन निर्णयातील तरतुदींचे पालन न करता त्यांना दरमहा रुपये १५०/- रोख रक्कम हाताळण्याबाबत विशेष वेतन प्रदान केले आहे. ही बाब उपरोक्त शासन निर्णयातील तरतुदींचा भंग करणारी आहे. तरी प्रत्यक्ष रोख रक्कम हाताळणीनुसार उचित विशेष वेतन प्रदान झाल्याचे प्रमाणित करावे. तसेच या अनियमिततेस मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांचे क्षमापन घेऊन अनुपालन दर्शवावे.

---

**मुंबई स्थानिक निधी लेखा परीक्षा अधिनियम १९३०**
**चे कलम ९ ( क ) खालील अनियमितता.**

एखाद्या व्यक्तीस तिला मिळालेली रक्कम लेख्यांमध्ये दाखविणे आवश्यक होते, परंतु जी अशी दाखविण्यांत आली नाही, अशी रक्कम

---

**परिच्छेद क्रमांक १२ :- अग्रीम नोंदवही परिरक्षित न केल्याबाबत.**

महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता १९६८ नियम २१२ नुसार नमुना ७९ मध्ये अग्रीम नोंदवही ठेवणे आवश्यक असून त्यात वेगवेगळ्या अग्रीमांसाठी स्वतंत्र पृष्ठे ठेवणे आवश्यक आहे.

तथापि पंचायत समिती इगतपुरी यांनी सन २००७ – २००८ या वित्तीय वर्षात विहित नमुन्यात अग्रीम नोंदवही परिरक्षित केलेली नाही. याबाबत अर्धसमास पत्र क्रमांक २१ दिनांक २९.११.२००८ नुसार अग्रीम नोंदवही उपलब्ध करुन देण्याबाबत मागणी केली असता सदर नोंदवही ठेवण्यात आलेली नसल्याचे लेखी स्वरुपात सादर करण्यात आले आहे.

अग्रीम नोंदवही ठेवण्यात न आल्याने सन २००७ – २००८ या वित्तीय वर्षाअखेर किती अग्रीम वसूली प्रलंबित आहे याची पडताळणी करता आलेली नाही.

शासन निर्णय, ग्रामविकास व जलसंधारण विभाग क्रमांक लेपुअ/१०९२/ प्र.क्र.१४६९/३०९३ दिनांक २६.२.१९८३ नुसार गटविकास अधिकारी यांनी ठोस कार्यवाही करुन थकीत अग्रीमाची वसूली करणे आवश्यक असतांना अग्रीम नोंदवही परिरक्षीत न करणे ही गंभीर अनियमितता असून आर्थिक हानीस कारणीभूत ठरणारी आहे.

तरी सन २००७ – २००८ या वर्षाची अग्रीम नोंदवही परिरक्षीत करुन त्यात परिपूर्ण व प्रमाणित नोंदी घेऊन आणि थकीत अग्रीमाची पूर्ण वसूली करुन सदर अनियमिततेस मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांच्या क्षमापनासह पुर्तता लेखापरीक्षणास दर्शवावी.

---

**परिच्छेद क्रमांक १३ :- ग्रामनिधी व जवाहर रोजगार योजना प्रलंबित अफरातफर प्रकरणांबाबत व लेखापरीक्षणास अभिलेखे उपलब्ध न करणेबाबत.**

अ) पंचायत समिती इगतपुरी अधिनस्त ग्रामपंचायत स्तरावरील ग्रामनिधी व जवाहर रोजगार योजनेतील अफरातफर प्रकरणांची माहिती अर्धसमास पत्र क्र. १९ दि. २४.११.०८ अन्वये मागविण्यात आली होती. प्राप्त माहितीनुसार खालीलप्रमाणे अभिप्राय नमुद करण्यात येत आहेत.

१) ग्रामनिधीतील एकूण २३ अफरातफर प्रकरणांमध्ये एकूण रुपये ९,८७,५७८/- इतकी रक्कम समाविष्ठ असून त्यांपैकी एकूण ११ प्रकरणांतील रक्कम रुपये ४,८६,५५७/- ची वसूली अद्याप करण्यात आलेली नाही.

२) जवाहर रोजगार योजनंतील एकूण १६ अफरातफर प्रकरणांमध्ये एकूण रुपये ११,०८,८८२/- समाविष्ठ असून त्यापैकी रुपये ७,७४,४६८/- इतक्या रक्कमेची वसूली करण्यात आली असून एकूण ९ प्रकरणातील रक्कम रुपये ३,३४,४१४/- ची वसूली अद्याप करण्यात आलेली नाही.

महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक पंरास-२००५/प्र.क्र.२६२/पंरास दिनाक ३.९.२००५ आणि ग्रामविकास व जलसंधारण विभाग परिपत्रक क्र. लेखाप २००७/प्र.क्र.७१२/वित्त-४/दिनांक २४ सप्टेंबर, २००८ मधील तरतुदींन्वये

अपहाराची रक्कम वसूल करणे व संबंधितांवर उचित प्रशासकीय कारवाई अथवा फौजदारी गुन्हा दाखल करणे बंधनकारक आहे. तथापि उपरोक्त गैरव्यवहार प्रकरणांमध्ये वेळीच विहित कार्यवाही करण्यांत आलेली नाही.

तसेच शासन निर्णय, ग्रामविकास व जलसंधारण विभाग क्र. डी. ई. एन २००६/प्र.क्र.७७१/आस्था-१२ दिनांक २८ सप्टेंबर २००६ मध्ये नमुद केल्याप्रमाणे या अफरातफर प्रकरणांसाठी ग्रामसेवक व सरपंचांसह पर्यवेक्षकीय विस्तार अधिकारी / गटविकास अधिकारी / कनिष्ठ अथवा शाखा अभियंता यांचेवर ही निश्चित करण्यात यावी असे निर्देश आहेत. मात्र त्या अनुषंगाने काहीही कार्यवाही झालेली नाही.

ब) प्रेषक कार्यालयांकडून ग्रामपंचायतीचेही वैधानिक लेखापरीक्षण करण्यात येते. मात्र लक्षणीय प्रमाणात या लेखापरीक्षणासाठी अभिलेखे उपलब्ध होत नसल्यान मा. मुख्य लेखा परीक्षक यांचे कार्यालयीन आदेश क्र. ९०, दिनांक १८.८.२००६ नुसार संबंधित लेखापरीक्षण घटक निकाली काढण्यात येतात. या संदर्भात मा. मुख्य लेखा परीक्षक यांचे पत्र क्र. स्था. लेप कार्यक्रम/१५३४/दिनांक २४.१०.२००८ व मा. विभागीय आयुक्त, नाशिक यांचे परिपत्रक क्र. विकास/लेखा/३-२/४७६/१४/०८ दिनांक १४.११.२००८ अन्वये अभिलेखे लेखापरीक्षणास उपलब्ध करुन न देणा-या ग्रामसेवकांनी कर्तव्यात कसूर केल्याप्रकरणी त्यांचे वेतन व भत्ते अमान्य करणे, तसेच लेखापरीक्षकांच्या व्यर्थ मनुष्यबळावर झालेला वेतन भत्त्यांचा खर्च संबंधित ग्रामसेवकांकडून वसूल करणे व त्यांचेवर उचित प्रशासकीय कारवाई करणे आवश्यक आहे.

माहे नोव्हेंबर २००८ अखेर इगतपुरी तालुक्यातील २७ ग्रामपंचायतीचे लेखापरीक्षणामध्ये सुमारे १२४ घटकांचे अभिलेखे लेखापरीक्षणास उपलब्ध न केल्याबाबत मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांना वेळोवेळी कळविण्यात आले असून सदर घटक निकाली काढण्यात आले आहेत. याबाबतचे तपशिल सोबतचे परिशिष्ट क्रमांक " २ " मध्ये नमुद करण्यात आले आहेत. याविषयी जिल्हा स्तरावर एकत्रित आक्षेप नोंदविण्यात येत आहे. मात्र किमान उपरोक्त नमुद मा. विभागीय आयुक्तांचे आदेशांन्वये कार्यवाही तातडीने हाती घेऊन ती किमान माहे मार्च, २००८ अखेरीस आढळलेल्या प्रकरणांमध्ये पूर्ण करण्यात यावे तसेच ग्रामपंचायत अधिनियम १९५८ चे कलम १४०(४) नुसार या प्रकरणाचे चौकशी अहवाल पंचायत समिती सभेसमोर सादर करुन विहित कार्यवाही अंती पुर्तता दर्शवावी.

उपरोक्त प्रकरणांतील अपहारित रक्कम वसूल न झाल्याने शासनाचे आर्थिक नुकसान झालेले आहे. याबाबत जबाबदारी निश्चित करुन उचित प्रशासकीय व दंडनीय कार्यवाहीसह अनुपालन लेखापरीक्षणास सादर करावे.

---

## मुंबई स्थानिक निधी लेखा परीक्षा अधिनियम १९३०
## चे कलम ९ ( ड ) खालील अनियमितता.

अ, ब, क व्यतिरिक्त लेख्यांमध्ये आढळून आलेल्या इतर अनियमितता.

---

**परिच्छेद क्रमांक १४ :- रोखवहीमधील शिल्लक रक्कमेच्या ताळमेळाबाबत.**

अ) **जिल्हानिधी :-**

पंचायत समिती इगतपुरी यांचेकडील जिल्हा निधी रोखवही नमुना नंबर ७ ची पडताळणी केली असता दिनांक ३१.३.२००८ अखेर खालीलप्रमाणे तफावत आढळून आली.

| | | |
|---|---|---|
| १) बँक स्क्रोलप्रमाणे शिल्लक रक्कम | रुपये | १,६०,००,६३५/- |
| २) रोखवहीप्रमाणे शिल्लक रक्कम | रुपये | ८०,५९,८७०/- |
| तफावत | रुपये | ७९,४०,७६५/- |

याबाबत खालीलप्रमाणे ताळमेळ नमुद केला आहे.

अधिक रक्कम

| | | |
|---|---|---|
| १) (+) न वटलेले धनादेश | रुपये | १,८०,७०,३५५/- |
| २) (+) धनादेश कमी खर्च रक्कम | रुपये | २००/- |
| ३) (+) व्यवसायकर कपात केली परंतु भरणा न केलेली रक्कम दि. १६.९.२००६ | रुपये | २७५/- |
| एकूण | रुपये | १,८०,७०,८३०/- |

वजा रक्कम

| | | |
|---|---|---|
| १) (-) बँकेने जमा न घेतलेली रक्कम दिनांक ३१.३.२००८ अखेर | रुपये | १,००,३१,१४०/- |
| २) (-) जि.प.वाढीव उपकरात जादा वर्ग केलेली रक्कम (९५०० ऐवजी ९८००) | रुपये | ३००/- |
| ३) (-) अभिकरण धनादेश चुकीने जिल्हा निधीत बँकेने खर्च दर्शविले | रुपये | ९३,०९३/- |
| ४) (-) जि.प.वाढीव उपकर धनादेश जिल्हा निधीतून बँकेने खर्च दर्शविला | रुपये | ५,५२७/- |
| | रुपये | १,०१,३०,०६०/- |
| निव्वळ तफावत | रुपये | ५/- |

उपरोक्त तफावतींबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय नमुद करण्यात येत आहेत.

१) दिनांक १६.९.२००६ रोजी कपात केलेली व्यवसायकर रक्कम रुपये २७५/- शासनास विहित मुदतीत भरणा न करणेबाबत संबंधितांची जबाबदारी निश्चित करुन व सदर रक्कम शासनास भरणा करुन पुर्तता लेखापरीक्षणास दर्शवावी.

२) कमी खर्च धनादेश रक्कम रुपये २००/- संबंधितांस अदा करुन पुर्तता लेखापरीक्षणास दर्शवावे.

३) जिल्हा परिषद वाढीव उपकरात जादा वर्ग रक्कम रुपये ३००/- चे समायोजन करुन पुर्तता लेखापरीक्षणास दर्शवावी.

४) बँकेने अभिकरण व जि. प. वाढीव उपकराचे धनादेश जिल्हा निधीतून खर्च दर्शविलेली रक्कम समायोजनाची कार्यवाही करुन पुर्तता लेखापरीक्षणास दर्शवावी.

५) लेखासंहिता नियम ५७ नुसार ताळमेळ दर्शवून तफावत दुर करुन पुर्तता लेखापरीक्षणास दर्शवावी.

६) दिनांक ३१.३.२००८ अखेर शिल्लक रक्कम रुपये ८०,५९,८७०/- चा बाबनिहाय गोषवारा नमुद केलेला नाही. सदरची शिल्लक रक्कम ही कोणत्या लेखाशिर्षाची आहे याचा बाबवार गोषवारा नमुद करुन शिल्लक रक्कम योग्य त्या लेखाशिर्षाखाली शासनास जमा करुन पुर्तता लेखापरीक्षणास दर्शवावी.

७) रोखवहीत माहे मार्च २००८ च्या लेख्यात अनेक ठिकाणी खाडाखोड करुन तसेच व्हाईटनर लावून उपरीलेखन केले आहे. सदरच्या नोंदी बरोबर असल्याची पडताळणी करुन स्वाक्षांकनासह पुर्तता दर्शवावी.

**ब) अभिकरण योजना :-**

पंचायत समिती, इगतपुरी यांचेकडील अभिकरण योजनेची रोखवही नमुना नंबर ७ ची पडताळणी केली असता दिनांक ३१.३.२००८ अखेर खालीलप्रमाणे तफावत आढळून आली.

| | | |
|---|---|---|
| १) बँक स्क्रोलप्रमाणे शिल्लक रक्कम | रुपये | ९३,९२,११०.६० |
| २) रोखवहीप्रमाणे शिल्लक रक्कम | रुपये | ४७,९७,९९९.६० |
| तफावत | रुपये | ४५,९४,१११.०० |

याबाबत खालीलप्रमाणे ताळमेळ नमुद केला आहे.

अधिक रक्कम

| | | |
|---|---|---|
| १) (+) न वटलेले धनादेश | रुपये | ५९,३९,९१५.०० |
| एकूण | रुपये | ५९,३९,९१५.०० |

वजा रक्कम

| | | |
|---|---|---|
| १) (-) बँकेने जमा न घेतलेली रक्कम | रुपये | १४,१८,९१३.०० |
| २) (-) बँकेने धनादेश जादा खर्च दर्शविला | रुपये | ५०.०० |
| तफावत | रुपये | ७३,१५९.०० |

महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता १९६८ चा नियम ५७ नुसार ताळमेळ घेऊन पुर्तता लेखापरीक्षणास दर्शवावी.

दिनांक ३१.३.२००८ रोजी शिल्लक रक्कमेबाबत बाबनिहाय गोषवारा नमुद करुन पुर्तता लेखापरीक्षणास दर्शवावी.

**क) जिल्हा परिषद सेस निधी (वाढीव उपकर) :-**

पंचायत समिती, इगतपुरी यांचेकडील उपकर रोखवही नमुना नंबर ७ ची पडताळणी केली असता दिनांक ३१.३.२००८ अखेर खालीलप्रमाणे तफावत आढळून आली.

१) बँक स्क्रोलप्रमाणे शिल्लक रक्कम रुपये ७२,३४,७८९.००
२) रोखवहीप्रमाणे शिल्लक रक्कम रुपये ४४,४३,६५६.००
तफावत रुपये २७,९१,१३३.००

याबाबत खालीलप्रमाणे ताळमेळ नमुद केला आहे.

अधिक रक्कम

१) (+) न वटलेले धनादेश रुपये ३९,५९,९०१.००

वजा रक्कम

१) (-) बँकेने जमा न घेतलेली रक्कम रुपये ११,५४,८३०.००
२) (-) धनादेश रु. १६० ऐवजी बँकेने
रु. १६३/- दर्शविल्याने जादा दर्शविलेला
खर्च रुपये ३.००
रुपये ११,५४,८३३.००
तफावत रुपये १३,९४१.००

उपरोक्त तफावतीबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय नमुद करण्यात येत आहेत.

१) न वटलेले धनादेश रुपये ३९,५९,९०१/- दर्शविले आहेत. प्रत्यक्षात ती रक्कम रुपये ३९,४५,९६३/- अशी असल्याने योग्य ती दुरुस्ती लेख्यात करण्यात यावी.
२) लेखासंहिता नियम ५७ नुसार ताळमेळ घेऊन तफावत निरंक करुन पुर्तता लेखापरीक्षणास दर्शवावी.
३) दिनांक ३१.३.२००८ रोजी शिल्लक रक्कमेचा बाबनिहाय गोषवारा नमुद करुन सदर रक्कमा कोणत्या लेखाशिर्षाच्या व कधीपासून प्रलंबित आहेत, याचा तपशिल नमुद करुन पुर्तता लेखापरीक्षणास दर्शवावी.
४) नोंदवहीवर कार्यालयीन मोहर उमटविण्यात आली नसून प्रमाणित करण्यात आलेली नाही. विहित पुर्तता करुन लेखापरीक्षणास दर्शवावे.
५) माहे मार्च २००८ च्या गोषवा-यावर गटविकास अधिकारी यांनी स्वाक्षरी केलेली नाही. स्वाक्षरीसह पुर्तता दर्शवावी.

**परिच्छेद क्रमांक १५ :- संबंधितांना धनादेश वितरीत न केलेबाबत.**

पंचायत समिती, इगतपुरीकडील जिल्हानिधी व अभिकरण योजनेच्या सन २००७-२००८ मधील रोखवही व धनादेश पुस्तक यांची पडताळणी केली असता काही धनादेश अद्यापपर्यंत संबंधितांना वितरीत करणेत आलेले नाहीत, असे आढळून आले.

| धनादेश क्रमांक | दिनांक | रक्कम रुपये |
|---|---|---|
| जिल्हा निधी | | |
| २७१७७४ | १४.३.२००८ | ९,७८९ |
| २७१७३३ | २९.२.२००८ | ११,६४२ |

| | | |
|---|---|---|
| ०१३३०२ | १४.३.२००८ | ७६६ |
| ०१३३०९ | १४.३.२००८ | ५,७०० |
| ०१३३२१ | १९.३.२००८ | ४,९९५ |
| ०१३३२३ | १९.३.२००८ | ४,५७१ |
| ०१३३८३ | २६.३.२००८ | १,६१,९८० |
| ०१३६३३ | ३१.३.२००८ | १२,०८० |
| ०१३६४८ | ३१.३.२००८ | ५०० |
| ०१३६५३ | ३१.३.२००८ | ३६,००० |
| **अभिकरण** | | |
| २७१७७६ | १४.३.२००८ | ३,००० |
| २७१८०९ | २२.२.२००८ | १,५०० |
| २७१८५० | २९.२.२००८ | २२,८३८ |
| २७१८६४ | २९.२.२००८ | १,०६० |
| २७१९४८ | २८.३.२००८ | २९,७३८ |
| २७१९५० | २८.३.२००८ | ६,१३९ |
| २७१९५५ | २८.३.२००८ | १,४३५ |

महाराष्ट्र जिल्हापरिषद व पंचायत समिती लेखासंहीता, १९६८ चे नियम २७ अन्वये लागलीच आवश्यकता असलेशिवाय खर्च करण्यास अनुमती नाही, असे असतांना गटविकास अधिकारी, पंचायत समिती यांनी केवळ त्या त्या लेखा शिर्षाखालील अनुदान व्यपगत होऊ नये म्हणून आवश्यकता नसतांनाच उपरोक्त खर्च नोंदविलेला आहे. याबाबत प्रत्येक प्रकरणी जबाबदारी निश्चित करण्यात यावी. तसेच उपरोक्त धनादेश रद्द करुन खर्चाच्या रक्कमा त्या त्या लेखाशिर्षाखाली जमा दर्शवून सुधारीत प्रमाणित वार्षिक लेख्यांसह अनुपालन सादर करावे.

---

**परिच्छेद क्रमांक १६ :- धनादेश रद्द न केल्याबाबत.**

पंचायत समिती, इगतपुरी येथील सन २००७-०८ चे लेखापरीक्षणामध्ये जिल्हानिधी, अभिकरण योजना निधी व जिल्हापरिषद सेस रोकडवहयांची पडताळणी केली असता दिनांक ३१.३.२००८ अखेर १ वर्षापेक्षा अधिक मुदतीचे धनादेश रद्द करण्यात आलेले नाहीत, असे स्पष्ट झाले.

महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता १९६८ चे नियम ३१ प्रमाणे एक वर्षापेक्षा अधिक काळ न वटलेले धनादेश रदद करुन योग्य त्या लेखाशिर्षाखाली जमा करणे आवश्यक आहे. अहवालासोबत जोडलेल्या परिशिष्ट क्रमांक “ ३ ” नुसार अनुक्रमे जिल्हा निधी, अभिकरण योजना निधी व जिल्हापरिषद सेस रोकडवहीनुसार नमुद केलेले मुदतबाहय धनादेश रदद करण्यात आलेले नाहीत.

सदर धनादेश रदद करुन रक्कमाचा योग्य त्या लेखाशिर्षाखाली भरणा करुन तसे अनुपालन लेखापरीक्षणास दाखवावे.

**परिच्छेद क्रमांक १७ :- अनामत रक्कम व्यपगत न केलेबाबत.**

पंचायत समिती इगतपुरी यांचेकडील अनामत नोंदवही नमुना नंबर ७१ ची पडताळणी केली असता दिनांक ३१.३.२००८ अखेर ३ वर्षापेक्षा जास्त कालावधीच्या विनामागणी असलेल्या कालबाह्य रक्कमा जमा आहेत.

| सन | सर्वसाधारण अनामत रुपये | सुरक्षा अनामत रुपये |
|---|---|---|
| २००१ – २००२ | ५,५०० | - |
| २००२ – २००३ | १२,५८१ | - |
| २००३ – २००४ | ९,५०० | १,४९७ |
| २००४ – २००५ | १,२४,५४७ | - |
| **एकूण** | १,५२,१२८ | १,४९७ |
| (१५२१२८ + १४९७ = १५३६२५) | | |

महाराष्ट्र जिल्हा परिषद लेखासंहिता १९६८ चा नियम २०९(७) नुसार तीन पूर्ण हिशोबाच्या वर्षात विनामागणी असलेल्या सर्व कालबाह्य ठेवी व्यपगत करुन परिषदेच्या खाती जमा करणे आवश्यक आहे. अशा व्यपगत ठेवींचे प्रदान लेखासंहिता नियम २०९(८) व २१९ नुसार स्थायी समितीच्या मंजूरीशिवाय करता येत नाही.

तथापि पंचायत समिती इगतपुरी यांनी उपरोक्त नमुद केल्याप्रमाणे सन २००१ – २००२ ते २००४ – २००५ या कालावधीतील जमा रक्कमा रुपये १,५३,६२५/- व्यपगत करुन परिषदेच्या खाती जमा करण्याची कार्यवाही केलेली नाही.

तरी ३ वर्षावरील कालबाह्य ठेवी रक्कम रुपये १,५३,६२५/- व्यपगत करुन परिषदेच्या खाती संकीर्ण जमा या लेखाशिर्षाखाली जमा करुन सदर विलंबाचे अनियमिततेसाठी मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांचे क्षमापनासह पुर्तता लेखापरीक्षणास दर्शवावी.

**परिच्छेद क्रमांक १८ :- व्यपगत ठेवींचा परतावा केल्याबाबत.**

पंचायत समिती इगतपुरी यांनी प्रमाणक क्रमांक ३७ दिनांक ७.१२.२००७ अन्वये रुपये ३,५००/- व प्रमाणक क्रमांक १३ दि. २.६.२००७ अन्वये रुपये ७०,०००/- ठेव परतावा खर्च नोंदविला आहे.

सदर प्रदान केलेल्या रक्कमा ह्या सन २००२ – २००३ व २००३ – २००४ या वित्तीय वर्षात ठेव सदरी जमा करण्यात आल्या होत्या.

महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता १९६८ चा नियम २०९(७)(३) नुसार तीन पूर्ण हिशोबाच्या वर्षात विनामागणी असलेल्या सर्व कालबाह्य ठेवी

व्यपगत करुन परिषदेच्या खाती जमा करणे आवश्यक असून लेखासंहिता नियम २१९ नुसार अशा व्यपगत ठेवींचे प्रदान स्थायी समितीच्या मंजूरीशिवाय करता येत नाही. तसेच अशा ठेवींचा परतावा महसूल परतावा म्हणून परिषदेच्या खाती दाखविण्यात यावा. अशी रक्कम ठेवीखाली खर्ची घालू नये.

तथापि उपरोक्त नियमांतील तरतुदींचे पालन न करता पंचायत समिती इगतपुरीने उपरोक्त नमुद व्यपगत ठेवींची रक्कम ठेव खाती खर्ची दर्शवून तसेच स्थायी समितीच्या मंजूरीशिवाय नियमबाह्यपणे प्रदान केले आहे.

याबाबत संबंधितांवर जबाबदारी निश्चित करावी व सदर अनियमिततेस जिल्हा परिषद स्थायी समितीची कार्योत्तर मंजूरी व क्षमापन प्राप्त करुन पुर्तता लेखापरीक्षणस दर्शवावी. तो पावेतो सदर खर्च रुपये ७३,५००/- आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.

ठेव परतावा

आक्षेपाधिन रक्कम रुपये ७३,५००/-

---

**परिच्छेद क्रमांक १९ :- लेखाशाखेतील रोखपालाकडील किरकोळ रोखवही नमुना नंबर ४ बाबत.**

सन २००७ – २००८ साठी पंचायत समिती, इगतपुरी अधिनस्त रोखपालाची किरकोळ रोखवही नमुना नंबर ४ मधील निवडक महिन्यांतील नोंदीची पडताळणी केली असता त्यामध्ये खालीलप्रमाणे अनियमितता आढळून आल्याः

१) सदरच्या नोंदवहीतील पृष्ठांवर कार्यालयाची गोल मोहर उमटविण्यात आलेली नसून नोंदवही सक्षम प्राधिका-याने प्रमाणित केलेली नाही.

२) दिनांक १.९.२००७ ते ७.९.२००७ या कालवधीत पावती क्रमांक ६०४१४४ ते ६०४१५८ ची जमा रक्कम एकत्रितपणे दिनांक ७.९.२००७ रोजी जमा दर्शविली असून ती रुपये १२५/- ऐवजी रुपये १२०/- रुपये ५/- ने कमी दर्शविली आहे.

३) दिनांक १२.९.२००७ ते १९.९.२००७ या कालावधीत पावती क्रमांक ६०४१६० ते ६०४१५८ ची जमा रक्कम रुपये १३०/- एकत्रितपणे दिनांक २०.९.२००७ रोजी जमा दर्शविली आहे.

४) पावती क्रमांक ६१५०८२ दि. १८.३.२००८ ची रक्कम रुपये ३५५/- दिनांक ९.७.२००८ केलेली विलंबाने जमा दर्शविली आहे.

५) दिनांक २८.९.२००७ रोजी दर्शविलेला खर्च रक्कम रुपये ४३,०२५/- व दिनांक २६.३.२००८ रोजी रुपये २९,२५४/- हा कोणत्या जमा रक्कमेतून केला याचा संदर्भ नमुद केलेला नाही. तसेच सदर प्रदान रक्कमेच्या पोहच पावत्या / वेतनपट दप्तरी ठेवण्यात आलेला नाही. त्यामुळे केलेले प्रदान संबंधितांना प्राप्त झाल्याची खात्री लेखापरीक्षणात करता आलेली नाही.

६) गटविकास अधिकारी यांनी महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता १९६८ चे नियम ५० व ४२ नुसार महिना अखेरची शिल्लक रक्कम तसेच अचानक पडताळणी करुन त्या दिनांकाची शिल्लक रक्कम यांची पडताळणी केलेली नाही.

महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता १९६८ चा नियम ५७ नुसार रोखपालाने केलेल्या जमा व खर्च रक्कमांचा हिशोब नमुना नंबर ४ च्या नोंदवहीत नोंदवून दैनिक शिल्लक दररोज लेखाधिकारी वा गटविकास अधिकारी यांच्या सहीने बंद करणे आवश्यक आहे. तसेच दिवसांची एकूण प्राप्ती व प्रदाने जमा व खर्चाच्या नोंदवहीशी जुळतात याची खात्री करणे आवश्यक आहे. तथापि रोखपालाने दैनंदिन जमा रक्कमा रोखवहीत एकत्रितपणे जमा दर्शविल्या आहेत. सदरची बाब ही नियमबाह्य असून सदर अनियमिततेस मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांचे क्षमापन घेऊन अनुपालन लेखापरीक्षणास दर्शवावे.

---

**परिच्छेद क्रमांक २० :- तालुका मास्तर इगतपुरी यांचेकडील रोकड नोंदवहीतील अनियमितता.**

तालुका मास्तर, इगतपुरी यांचेकडे दिनांक १.४.२००७ ते ७.११.२००७ या कालावधीत रोख नोंदवही नमुना नंबर १ ह्या दोन नोंदवह्या दप्तरी ठेवण्यात येऊन दैनंदिन व्यवहारांसाठी वापर केलेला आहे.

कालावधी रोखवही – १ दिनांक १.४.२००७ ते ३०.८.२००७

रोखवही – २ दिनांक १७.९.२००७ ते ७.११.२००७

| रोखवही नोंदवही क्रमांक १ | रोखवहीतील कोरे ठेवलेले पृष्ठ क्रमांक |
|---|---|
| दिनांक ४.४.२००७ ते ३१.५.२००७ | ८०,८१,८४ व ८५ |
| दिनांक ५.६.२००७ | ९४ व ९५ |
| दिनांक १०.७.२००७ ते १८.७.२००७ | ९७ |
| दिनाक ३.९.२००७ ते १७.९.२००७ | ९९ ते १०२ |
| **नोंदवही क्रमांक २** | |
| दिनांक ९.१०.२००७ ते ३१.१०.२००७ | १ ते ३ व ७ |
| दिनांक ५.११.२००७ ते ७.११.२००७ | ९ ते ९९ |

उपरोक्त कालावधीत लेखापरिक्षणासाठी नमुद महिन्यात खालील तपशिलानुसार धनादेशाद्वारे खर्च नोंदविण्यात आलेला आहे.

| अ. क्र. | दिनाक | धनादेश क्र. | रक्कम रु. | कोषास प्रदान | तपशिल | धनादेश प्रकार |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | ०३.९.०७ | ९२७ | ५७८८७ | मा. दे. मेमणी | वेतन | बेअरर |
| २ | १७.९.०७ | ९२८ | ७१२९ | शकुंतला श्रावण सोनवणे | वेतन | बेअरर |
| ३ | १७.९.०७ | ९२९ | ६०००० | झुंबर सीताराम खेताडे (तामा) | दत्तक पालक योजना | स्वतः |
| ४ | १७.९.०७ | ९३० | ३५० | ता. य. कोरडे | पुरस्कार | क्रॉस |
| ५ | १७.९.०७ | ९३१ | २५० | वा. ह. पठाडे | पुरस्कार | क्रॉस |

या संदर्भात खालील अभिप्राय देण्यात येत आहे.

१) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता १९६८ चे नियम क्र. २९(४) नुसार रुपये १,०००/- वरील रक्कम प्रदान करतांना रेखांकीत धनादेशाद्वारे प्रदान करणे आवश्यक असतांना संबंधितांना रक्कम रुपये ५७,८८७/- व ७१,१२९/- ह्या रक्कमेचे बेअरर धनादेशाद्वारे प्रदान करुन नियमांचे पालन केलेले नाही.

२) तसेच दत्तक पालक योजनेची रुपये ६०,०००/- ची रक्कम तालुका मास्तर यांनी स्वत: बँकेतून काढून संबंधित शाळांना वाटप केलेली आहे. महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता १९६८ चे नियम २५(२) नुसार सदरची रक्कम धनादेशाद्वारे प्रदान करणे आवश्यक असतांना नियमांचे पालन न करणेबाबत संबंधित तालुका मास्तर यंचे वर जबाबदारी निश्चित करावी.

तसेच या अनियमिततेबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नाशिक यांचे क्षमापन घेऊन अनुपालन पुर्तता दर्शवावी.

गटशिक्षणाधिकारी पंचायत समिती इगतपुरी यांचेकडील जा.क्र./शिक्षण/ ग.शि./आस्था/२/४१९ दिनांक ७.११.२००७ अन्वये श्री. एम. एम. भावसार यांना तालुका मास्तर पदाचा कार्यभार सोपविला आहे. त्यांनी दिनांक ७.११.२००७ रोजी कार्यभार स्विकारुन नव्याने रोखवही सुरु करुन त्यामध्ये दिनांक ७.११.२००७ ची सुरुवातीची शिल्लक रुपये ४,७५,९९३.२५ एवढी नमुद करुन दैनंदिन व्यवहार सुरु केलेला आहे. त्यानंतर खालील धनादेशांद्वारे खर्च नोंदविलेला आहे.

| दिनांक | धनादेश क्र. | रक्कम रुपये | तपशिल |
|---|---|---|---|
| २०.१२.२००७ | ९३०९५१ | २,५०० | बालवाडी शिक्षिका मानधन |
| १७.०१.२००८ | ९३०९५३ | १,००० | इगतपुरी येथील अनुपम वर्ग बालवाडी शिक्षिका मानधन |
| ३१.०३.२००८ | ९६३३०१ | १,००० | बालवाडी शिक्षिका मानधन अप्परपेठ, जिल्हा परिषद शाळा |
| ३१.०३.२००८ | ९६३३२४ | ४,९५० | मुलांची गळती थांबविणेबाबत मुख्याध्यापक कावनाई |

उपरोक्त तपशिलानुसार प्रदान केलेल्या रक्कमांच्या पोहोच पावत्या संबंधितांकडून घेण्यात आलेल्या नाहीत. त्यामुळे रक्कमा संबंधित मिळाल्याची खात्री लेखापरीक्षणास करता आली नाही. पोहोच पावत्या उपलब्ध करुन अनुपालन दर्शवावे.

रोखवहीतील शिल्लकेचा तपशिल —

| | |
|---|---|
| दिनांक ३१.३.२००८ रोजी बँकेतील शिल्लक | रुपये ६,६७,२०१.०५ |
| दिनांक ३१.३.२००८ रोजी रोजकिर्दीतील शिल्लक | रुपये ४,८२,८९३.०० |
| तफावत | रुपये १,८४,३०८.०५ |

वरील तफावत रक्कमेचा मेळ घेण्यात याव. तसे अखर्चित रक्कमेचा शोध घेऊन व निधीत रक्कम किती शिल्लक आहे याबाबत खात्री करुन अखर्चित रक्कम ज्या त्या लेखाशिर्षाखाली भरणा करुन अनुपालन दर्शवावे.

मुख्याध्यापक जनता विद्यालय, सांजेगाव यांना अनुसुचित जाती / जमातीच्या मुलांची गळती थांबविणे या योजनेची रक्कम धनादेश क्रमांक ६३२६७ दिनांक ३१.३.२००८ नुसार रुपये १,८००/- प्रदान केलेली आहे. बँकेने मात्र सदरच्या धनादेशाचे प्रदान रुपये १,९००/- दर्शविले आहे. म्हणजेच रुपये १००/- खर्च जादा नमुद केलेला आहे. याबाबत योग्य तो मेळ घेऊन अनुपालन दर्शवावे.

---

**परिच्छेद क्रमांक २१ :- गटविकास अधिकारी यांचेकडील वाटप केलेले धनादेशांची नमुना नंबर ४ व ११ मध्ये नोंद नसलेबाबत.**

**अ)** पंचायत समिती, इगतपुरी अंतर्गत प्राथमिक आरोग्य केंद्र, वैतरणा यांचेकडील सन २००७-०८ मधील लेख्यांची तपासणी केली असता, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, इगतपुरी यांचेकडून वितरीत होणारे धनादेशांपैकी काही निवडक धनादेशांची माहिती खालीलप्रमाणे दिली आहे.

| धनादेश क्र. | दिनांक | रक्कम रुपये | तपशिल | न. नं. ४ मधील नोंद | न. नं. ११ मधील नोंद |
|---|---|---|---|---|---|
| ८८८४९८ | ३०.३.२००७ | १,००० | मेडिसीन | नोंद नाही | नोंद नाही |
| ८८८६२९ | २३.४.२००७ | ४,३५६ | स्टेशनरी | नोंद नाही | नोंद नाही |
| ९३०५१८ | ११.६.२००७ | ९,१८८ | डिझेल बील | नोंद नाही | नोंद नाही |
| १५२४३६ | १.११.२००७ | १०,६७३ | डिझेल व स्टेशनरी | नोंद नाही | नोंद नाही |
| ०१३६६३ | ३१.३.२००८ | ९,८६० | डिझेल व किरकोळ | नोंद आहे | नोंद नाही |

**ब)** पंचायत समिती, इगतपुरी अंतर्गत प्राथमिक आरोग्य केंद्र, बेलगाव कु-हे, यांचेकडील सन २००७-०८ मधील लेख्यांची तपासणी केली असता, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, इगतपुरी यांचेकडून वितरीत होणारे धनादेशांपैकी काही निवडक धनादेशांची माहिती खालीलप्रमाणे देत आहोत.

| धनादेश क्र. | दिनांक | रक्कम | तपशिल | न. नं. ४ मधील नोंद | न. नं. ११ मधील नोंद |
|---|---|---|---|---|---|
| ७९४५६९ | २८.०३.०७ | ४,३९७ | स्टेशनरी | नोंद नाही | नोंद नाही |
| ८८८५२४ | ३०.०३.०७ | ६,३०७ | स्टेशनरी | नोंद नाही | नोंद नाही |
| १५२३७७ | २६.१०.०७ | ८,८७५ | पाडावर्कर,अति.भत्ता देयक | नोंद नाही | नोंद नाही |
| ०१३७७३ | ३१.३.२००८ | ११,०११ | जीप दुरुस्ती, डिझेल | नोंद नाही | नोंद नाही |

उपरोक्त दर्शविलेले धनादेशांबाबत नमुना नंबर ४ व ११ मध्ये नोंदी घेण्यात आलेल्या नाहीत. याबाबत संबंधीतांनी आर्थिक विनियोगाच्या परिपूर्ण नोंदी लेख्यात न घेण्याबाबत जबाबदारी निश्चित करावी व संबंधित नमुना नंबर ११ (बेलगाव कु-हे) हे दिनांक ९.४.२००८ पर्यंतच पुर्ण केल्याने गटविकास अधिकारी यांचे स्तरावरुन संबंधितांना पूर्ण आर्थिक

वर्षात प्रदान केलेले धनादेश व त्यांचा विनियोग याची पडताळणी करण्यात यावी. सदर अनियमिततेस मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांच्या क्षमापनासह पुर्तता लेखापरीक्षणास दर्शवावी.

---

**परिच्छेद क्रमांक २२ :- दिलेल्या अग्रिमाचे नियमबाहय समायोजनाबाबत.**

पंचायत समिती, इगतपुरी सन २००७-०८ मध्ये जिल्हापरिषद सेस अंतर्गत प्रमाणक क्रमांक ६९ दिनांक ३१.३.२००८ अन्वये श्री. साहेबराव विठठल जाधव, वाहन चालक यांना त्यांचे अर्जानुसार दिनांक ८.४.२००८ ते १२.४.२००८ या कालावधीत हगणदारी मुक्त योजना कार्यगटासाठी रक्कम रुपये ५,०००/- इतके इंधनासाठी अग्रिम म्हणुन दिलेले आहे.

प्रमाणक क्रमांक १०० दिनांक ३१.३.२००८ अन्वये सदरच्या रकमेचे समायोजन करण्यात आले असून त्यातील उपप्रमाणके ही वाहनावरील दिनांक ८.२.२००८ ते २१.३.२००८ पर्यंतच्या खर्चाबाबतची जोडलेली आहे.

याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

(१) महाराष्ट्र जिल्हापरिषद व पंचायत समिती लेखासंहीता १९६८ मधील नियम २१० (ब) प्रमाणे रक्कम रुपये ५००/- चे वर अग्रिम देण्याचे अधिकार नसतांना तसेच मार्च महिन्यात कोणतेही अग्रिम दयावयाचे नसतांना अग्रिम मंजुर करुन अदा केलेले आहे.

(२) दिलेले अग्रिम हे त्याच कामासाठी न वापरता केलेल्या कामाबाबतची बिले खर्ची टाकून समायोजन करण्यात आले आहे.

उपरोक्त केलेल्या नियमबाहय कार्यवाहीबाबत मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांचे क्षमापन प्राप्त करावे.

---

**परिच्छेद क्रमांक २३ :- देयके प्रदान करतांना प्राप्त अनुदानाचा तपशील नमुद न केल्याबाबत.**

पंचायत समिती इगतपुरी यांचेकडील प्रदान देयकांचे लेखापरीक्षण केले असता, देयक प्रदान करतांना देयकांवर प्राप्त अनुदान, झालेला खर्च व शिल्लक अनुदान इत्यादी आवश्यक तपशिल नमुद केलेला नाही, असे स्पष्ट झाले.

महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता १९६८ चे नियम ११० ते ११८ मधील तरतुदींनुसार मंजूर अनुदानापेक्षा जादा खर्च करता येत नाही.

देयकांवर अनुदान तपशील नमुद केलेला नसल्याने देयक प्रदान करतांना अवश्यक ते अनुदान उपलब्ध होते किंवा कसे? तसे सन २००७ – २००८ या वित्तीय वर्षात प्रत्येक लेखाशिर्षांतर्गत तपशिलवार शिर्षनिहाय मंजूर अनुदानाच्या मर्यादेत खर्च झाला किंवा कसे याबाबत पडताळणी करता आलेली नाही.

तरी सन २००८ – २००९ मध्ये प्रत्येक मंजूर देयकांवर अनुदानाचा तपशिल नमुद करण्याची कार्यवाही सुरु करुन व सन २००७ – २००८ मध्ये प्रत्येक लेखाशिर्षनिहाय

झालेला खर्च मंजूर अनुदानाच्या मर्यादेत झाल्याची खात्री करुन व तसे प्रमाणित करुन अनुपालन लेखापरीक्षणास दर्शवावे.

---

**परिच्छेद क्रमांक २४ :- आर्थिक वर्षात देय नसलेल्या रक्कमांचे प्रदान केलेबाबत.**

पंचायत समिती इगतपुरी यांनी प्रमाणक क्रमांक २४३ दिनांक ३१.३.२००८, रक्कम रुपये ९,२६,८१७/- नुसार माहे मार्च २००८ चे पोषण आहाराचे खर्चाचे प्रदान केले आहे.

माहे मार्च २००८ या महिन्यातील किमान काही अखेरच्या दिवसांसाठीच्या आहारांच्या खर्चाचे प्रदान १ एप्रिल २००८ रोजी म्हणजेच सन २००८ – २००९ मध्ये देय होत असतांना केवळ शिल्लक अनुदान खर्च करण्याच्या उद्देशानेच सदर खर्च सन २००७ – २००८ या वित्तीय वर्षात करण्यात आला आहे.

सदर अनियमिततेबाबत मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांचे क्षमापन प्राप्त करुन घेऊन अनुपालन लेखापरीक्षणास दर्शवावे.

---

**परिच्छेद क्रमांक २५ : जामिन कदबे व जामीनदार हयात व लायक असलेचे दाखले न घेतलेबाबत**

पंचायत समिती, इगतपुरीमधील काही कर्मचा-यांचे जामीनदार हयात व लायक असले बाबत दाखले दप्तरी नाहीत. त्याबाबतचा तपशील खालीलप्रमाणे देण्यात आला आहे.

१. श्रीमती एफ यु नाईकवाडे, मुख्यसेविका
२. श्रीमती जे एम गांगुर्डे, मुख्यसेविका
३. श्रीमती जे के काळे, मुख्यसेविका
४. श्रीमती एम पी शार्दुल, मुख्यसेविका
५. श्रीमती यु पी सरोदे, मुख्यसेविका
६. श्रीमती एल एस डावरे, मुख्यसेविका
७. श्रीमती सी एम कुलट, मुख्यसेविका
८. श्रीमती एस एल पगारे, वरिष्ठ सहाय्यक
९. श्री. जी एस खैरे, वाहन चालक
१०. श्री. वसंत अभिमान काकडे, कनिष्ठ सहाय्यक, प्रा आ केंद्र धामणगाव
११. श्री. कैलास पांडुरंग कोरडे, कनिष्ठ सहाय्यक, प्रा आ केंद्र नादगाव सदो
१२. श्री. प्रशांत श्रीराम रोकडे, औषध निर्माता, प्रा आ केंद्र वाडीव-हे
१३. श्रीमती सविता माधवराव बागुल, औषध निर्माती, प्रा आ केंद्र खेड
१४. श्रीमती वर्षा लक्ष्मणसिंग रजपुत, औषध निर्माती, प्रा आ केंद्र वैतरणा
१५. श्री. आनंदा दगडु गोडसे, वाहन चालक, प्रा आ केंद्र, वैतरणा
१६. श्री. जगदिश बाक्या पोतम, वाहन चालक, प्रा आ केंद्र खेड
१७. श्री. साहेबराव विठठल जाधव, वाहन चालक , पं स इगतपुरी

१) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता, १९६८ चे नियम ४३(१) अन्वये आर्थिक व्यवहार हाताळत असणा-या कर्मचा-यांकडून जामिन कदबा घेणे आवश्यक असतांना उपरोक्त अ.क्र. १ ते ४ यांचेकडून अद्याप जामिन कदबा घेतलेला नाही. तरी उपरोक्त नियमांप्रमाणे कार्यवाही करुन अनुपालन लेखापरीक्षणात दाखवावे.

२) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता, १९६८ चे नियम ४३(२) अन्वये प्रत्येक वित्तीय वर्षाचे सुरुवातीस जामीनदार हयात व लायक असल्याचे दाखले घेणे आवश्यक आहे. तरी उपरोक्त अ.क्र. ५ ते १७ यांचेकडून जामिनदार हयात व लायक दाखले प्राप्त करुन अनुपालन लेखापरीक्षणात दाखवावे.

---

**परिच्छेद क्रमांक २६ :- बाहयरुग्ण फी उशिरा भरणा केलेबाबत.**

अ) पंचायत समिती, इगतपुरी अंतर्गत प्राथमिक आरोग्य केंद्र वैतरणा यांचेकडील सन २००७-०८ रोकडवहीची पडताळणी केली असता, दवाखान्यांकडील खालीलप्रमाणे ओपीडी फी वसुल रक्कम कमीत कमी १ महिन्यानंतर जिल्हापरिषद निधीत चलनाव्दारे भरणा केलेली आहे.

| कालावधी | रक्कम | तपशिल | प्रत्यक्षात भरणा |
|---|---|---|---|
| ०१.०२.२००७ ते १६.०४.२००७ | ३२२४ | ओपीडी | १६.०४.२००७ |
| १७.०४.२००७ ते २९.०५.२००७ | २४९० | ओपीडी | ३१.०५.२००७ |
| | ३५० | डॉग बाइट | ३१.०५.२००७ |
| ३०.०५.२००७ ते १९.०७.२००७ | २९६२ | ओपीडी | १४.०९.२००७ |
| २०.०७.२००७ ते ०९.०९.२००७ | २३९४ | ओपीडी | २०.०९.२००७ |
| ११.०९.२००७ ते २२.०९.२००७ | ५९८ | ओपीडी | २८.०९.२००७ |
| | २५० | डॉग बाइट | २८.११.२००७ |
| १९.११.२००७ ते ०८.१२.२००७ | ९२० | ओपीडी | २६.१२.२००७ |
| | १२५० | डॉग बाइट | २६.१२.२००७ |
| १०.१२.२००७ ते १६.०१.२००८ | १८६२ | ओपीडी | ०१.०२.२००८ |
| १८.०१.२००७ ते ०८.०३.२००८ | १५९२ | ओपीडी | २५.०३.२००८ |
| १०.०३.२००८ ते १६.०४.२००८ | ९९८ | ओपीडी | ३०.०४.२००८ |

ब) पंचायत समिती, इगतपुरी अंतर्गत प्राथमिक आरोग्य केंद्र बेलगांव कु-हे यांचेकडील सन २००७-०८ रोकडवहीची पडताळणी केली असता, दवाखान्यांकडील खालीलप्रमाणे ओपीडी फी वसुल रक्कम कमीत कमी १ महिन्यानंतर जिल्हापरिषद निधीत चलनाव्दारे भरणा केलेली आहे.

| कालावधी | रक्कम | प्रत्यक्षात भरणा |
|---|---|---|
| ६.३.२००७ ते ४.४.२००७ | १,७१८ | १६.४.२००७ |

| | | |
|---|---|---|
| ५.४.२००७ ते २४.५.२००७ | २,२१० | ३१.५.२००७ |
| २५.५.२००७ ते ३०.६.२००७ | २,३०६ | १६.७.२००७ |
| २.७.२००७ ते ३१.७.२००७ | २,०५० | २२.८.२००७ |
| १.८.२००७ ते २०.९.२००७ | ३,८७४ | २८.९.२००७ |
| २१.९.२००७ ते ३०.१२.२००७ | ६,२७८ | ५.१.२००८ |
| १.१.२००८ ते ३०.१.२००८ | १,५२६ | १.२.२००८ |
| ३१.१.२००७ ते १८.३.२००८ | २,०५२ | २५.३.२००८ |

महाराष्ट्र जिल्हापरिषद व पंचायत समिती लेखासंहीता, १९६८ चे नियम १३ अन्वये वसुल केलेली रक्कम दररोज जमा करणे आवश्यक आहे. नियम क्रमांक ४९ अन्वये उशिरात उशिरा १५ दिवसात रक्कमेचा भरणा करणे आवश्यक आहे. परंतु तशी कार्यवाही केलेली नाही. बाहयरुग्ण फी जास्त दिवस हातात ठेवणे ही बाब नियमबाहय आहे.

उपरोक्त अनियमिततेबाबत जबाबदारी निश्चित करुन मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांच्या क्षमापनासह अनुपालन दर्शवावे.

---

**परिच्छेद क्रमांक २७ :- शिल्लक रक्कम अद्याप भरणा न केलेबाबत.**

पंचायत समिती, इगतपुरी अंतर्गत प्राथमिक आरोग्य केंद्र, नांदगाव सदो यांचेकडील सन २००७-०८ ची किरकोळ रोकडवही तपासणी केली असता, धनादेश क्रमांक ९३०४७६ दिनांक ४.६.२००७ अन्वये टेलिफोन बील भरणा करण्यासाठी दिलेली रक्कम रुपये १,१०१/- किरकोळ रोकडवहीत दिनांक २५.७.२००७ रोजी जमा घेण्यात आलेली आहे. परंतु सदरची रक्कम अद्याप लेखापरीक्षण कालावधीअखेर (दिनांक २७.११.२००८) किरकोळ रोकडवहीत पडून आहे.

महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता १९६८ चा नियम ७७(३) नुसार ३ महिन्यांपेक्षा जास्त अवितरीत रक्कमा परिषदेकडे भरणा करणे आवश्यक असतांना अशी कार्यवाही करण्यात आलेली नाही.

रक्कम रुपये १,१०१/- तात्काळ योग्य त्या लेखाशिर्षाखाली भरणा करण्यात यावी व आवश्यकता नसतांना काढलेली रक्कम अथवा योग्य त्या कारणासाठी काढलेली रक्कम भरणा न करण्याबाबत संबंधीतांची जबाबदारी निश्चित करण्यात येऊन मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांच्या क्षमापनासह पुर्तता लेखापरीक्षणास दर्शवावी.

---

**परिच्छेद क्रमांक २८ :- नवीन परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजनेनुसार कपात केलेल्या अशंदान रक्कमेबाबत.**

पंचायत समिती, इगतपुरी यांनी दिनांक १.११.२००५ नंतर सेवेत दाखल झालेल्या कर्मचा-यांची निवृत्ती वेतन अंशदानाची रक्कम कपात करुन दि. ३०.११.२००८ अखेर पर्यंत रुपये १,१२,६५५/- ठेव सदरी जमा केलेली आहे.

या संदर्भात अभिप्राय नमुद करण्यात येत आहेतः

१) महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक अंनियो-१००७/१८/सेवा-४/ दिनांक ७.७.२००७ अन्वये नवीन परिभाषित अशंदान निवृत्ती वेतन योजनेच्या अंमलबजावणीची कार्यपध्दती निश्चित करण्यात आली आहे.

सदर शासन निर्णयातील परिच्छेद ८ नुसार सर्व आहरण व संवितरण अधिका-यांनी दिनांक १.११.२००५ नंतर सेवेत दाखल झालेल्या कर्मचा-यांची माहिती नमुना नंबर १ मध्ये प्राप्त करुन राज्य अभिलेख देखभाल अभिकरण, मुंबई यांना सादर करुन सदर कर्मचा-यांचा “ निवृत्ती वेतन लेखा क्रमांक ” प्राप्त करुन घेणे आवश्यक आहे.

तसेच उपरोक्त शासन निर्णयातील परिच्छेद क्रमांक २८ नुसार जिल्हा परिषदेतील कर्मचा-यांना योग्य त्या फेरफारांसह सदर योजना लागू करण्यात अली असून कर्मचा-यांच्या अंशदानाइतके समतुल्य अशंदान राज्य अभिलेख देखभाल अभिकरणास जमा करणे आवश्यक आहे.

तथापि पंचायत समिती, इगतपुरी यांनी राज्य अभिलेख देखभाल अभिकरण, मुंबई यांचेकडून अद्यापपावेतो संबंधित कर्मचा-यांचे निवृत्ती वेतन लेखा क्रमांक प्राप्त करुन घेतलेले नाही, कर्मचा-यांकडून कपात केलेली अंशदानाची रक्कम ठेव सदरी जमा ठेवलेली आहे. तसेच कर्मचारी अशंदानाइतके समतुल्य जिल्हा परिषदेचे अंशदान प्रदान करण्याबाबत कोणतीही तरतुद केलेली नाही.

कपात केलेली अंशदानाची रक्कम त्यावर देय होणारे व्याज संस्थेचा हिस्सा व त्यावरील व्याज व सदर योजनेनुसार समाविष्ठ कर्मचा-यांच्या भविष्याबाबतचे दायित्व हे अंशदान वसूली केल्यापासून ते राज्य अभिलेख देखभाल अभिकरण, मुंबई यांना प्रदान होईपर्यंत प्रत्येक संस्थांच्या कार्यालय प्रमुखावर असल्याने निवृत्ती वेतन लेखा क्रमांक प्राप्त करणेसाठी आवश्यक त्या सर्व बाबींची पुर्तता करणेची सर्वस्वी जबाबदारी ही कार्यालय प्रमुख या नात्याने गटविकास अधिकारी यांचेवर आहे.

तरी याबाबत पंचायत समिती इगतपुरी यांनी उपरोक्त शासन निर्णयातील तरतुदींनुसार संबंधित कर्मचा-यांचे निवृत्ती वेतन खाते क्रमांक प्राप्त करुन घेऊन ठेव सदरी जमा केलेली रक्कम व कर्मचा-यांच्या अंशदानाइतके समतुल्य अंशदान राज्य अभिलेख देखभाल अभिकरण मुंबई यांचेकडे त्वरीत जमा करावे व पुर्तता लेखापरीक्षणास दर्शवावी.

---

**परिच्छेद क्रमांक २९ :- एकस्तर पदोन्नती वेतन श्रेणीनुसार गटविमा वर्गणी कपात केल्याबाबत.**

पंचायत समिती इगतपुरी यांचेकडील या अहवालासोबत जोडण्यात आलेल्या परिशिष्ट क्रमांक “ ४ ” मध्ये नमुद केलेल्या कर्मचा-यांना एकस्तर पदोन्नतीचा लाभ प्रदान केल्यानुसार परिशिष्टात नमुद अ.क्र. २ ते ५ व ७ ते १२ यांची गटविमा वर्गणी एकस्तर पदोन्नती वेतनश्रेणीनुसार कपात करण्यात येत आहे.

सदर गटविमा वर्गणी दरात बदल मा. कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग यांचे पत्र क्रमांक गवियो-२००५/प्र.क्र.४२३/आस्था-५, दिनांक २५.१.२००६ नुसार करण्यात आलेला आहे.

महाराष्ट्र शासन, शासन निर्णय, क्रमांक डीओआय/२०८१/४७०१/एडीएम-५ दिनांक २६.४.१९८२ चा परिच्छेद क्रमांक ५.२ नुसार एखाद्या कर्मचा-यास एका वर्गातून दुस-या वर्गात नियमित बढती मिळाल्यास योजनेच्या पुढील वर्धापन दिनापासून त्याच्या वर्गणीत बढती मिळाली असेल त्या वर्गाच्या समुचित पातळीप्रमाणे वाढ करण्यात येईल; तसेच महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, परिपत्रक क्रमांक गवियो/११८३/आर-३५९/सी.आर. ९३/८३/एडीएम-५ दिनांक ७.४.१९८४ नुसार एकदा कर्मचा-यास वरच्या वर्गात दाखल करुन घेतले की, सदर वर्गणीचा दर जरी तो पुढे खालच्या वर्गात प्रत्यावर्तित झाला तरी तोच दर कायम राहील.

पंचायत समिती इगतपुरी यांनी एकस्तर पदोन्नती नुसार गटविमा वर्गणीत बदल केलेला आहे. सदर एकस्तर पदोन्नती ही आदिवासी क्षेत्रात कार्यरत असे पर्यंतच लागू होत असल्याने त्यास नियमित पदोन्नती मानता येत नाही. अशा कर्मचा-यांची गटविमा वर्गणी बदल करणे हे उपरोक्त शासन निर्णयातील तरतुदीस बाधा ठरत असल्याने संबंधित कर्मचा-यांना गटविमा लाभ प्रदान करतांना अडचणीची ठरु शकते.

तरी याबाबत शासन स्तरावरुन सुधारीत मार्गदर्शन प्राप्त करुन घेऊन त्यानुसार गटविमा वर्गणी कपात करण्याची कार्यवाही करावी व तसे अनुपालन लेखापरीक्षणास सादर करावे.

---

**परिच्छेद क्रमांक ३० :- निवृत्ती वेतन प्रदान नोंदवही अपूर्ण असणेबाबत.**

जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता १९६८ मधील नियम ३९ परिशिष्ट ४ मधील नियमान्वये पंचायत समितीत येणा-या प्रत्येक मागणी बिलाची व नोंदवहीची गट विकास अधिकारी यांनी प्रदान आदेशावर सही करण्यापूर्वी कनिष्ठ लेखा अधिका-यांकडून तपासणी होणे आवश्यक आहे.

पंचायत समिती, इगतपुरी यांचेकडील गटशिक्षण अधिकारी यांचे कार्यालयांतील निवृत्ती वेतन देयके, निवृत्ती वेतन नोंदवही (ए.पि.पि.९) आणि उपदान व अंशराशीकरण नोंदवही (नमुना ए.पी.पी. १०) यांची तपासणी केली असता त्यामध्ये खालीलप्रमाणे अपूर्णता व तृटी आढळून आलेल्या आहेत.

१. नमुना ए.पी.पी. ९ मधील लेखापरीक्षण नोंदवहीत निवृत्ती वेतनाचा प्रकार, निवृत्ती वेतन सुरु झाल्याचा दिनांक, अशंराशीकरण केलेली रक्कम व प्रदानाचा दिनांक, मुळ निवृत्ती वेतन, अशंराशीकरणानंतरची रक्कम, महागाई भत्त्याचे दर, मासिक एकत्रित निवृत्ती वेतन / कुटूंब निवृत्ती वेतनाचे दर, निवृत्ती वेतनधारक मृत्यू पावल्यास मृत्यूची नोंद, वारसांची नोंद, प्रत्येक महिन्यांत किती निवृत्ती वेतन प्रदान केलेले याची नोंद व तपासणी केल्याबद्दल लेखाधिकारी यांची स्वाक्षरी, जिवीत प्रमाणपत्राची नोंद, पुनर्विवाहाची / पुनर्नियुक्तीची नोंद, वयांची ६५ वर्षे पूर्ण किंवा मृत्यूनंतर ७ वर्षे यांपैकी जे अगोदर घडले असेल इत्यादी संबंधीच्या तारखा, मृत्यूनंतरच्या जादा प्रदान केलेल्या रक्कमा बँकेकडून परत मागवून शासन सदरी भरणा केल्याबद्दलच्या चलनासह नोंदी, अशंराशीकरणानंतर १५ वर्षांनी पुनर्स्थापना केल्याबाबतच्या नोंदी, चौथ्या, पाचव्या वेतन आयोगाच्या शिफारशीनुसार सुधारीत निवृत्ती वेतन आदेशाप्रमाणे सुधारीत निवृत्ती वेतन / कुटूंब निवृत्ती वेतनाच्या नोंदी बँकेचे नाव व खाते क्रमांक इत्यादी नोंदी

परिपूर्ण घेण्यांत आलेल्या नसल्यामुळे निवृत्ती वेतन धारकांस / कुटूंब निवृत्तीवेतनधारकांस योग्य प्रदान झाले किंवा कसे याबाबत लेखापरीक्षणांत परिपूर्ण पडताळणी करता आलेली नाही.

२. बँकेमार्फत निवृत्तीवेतन घेणा-या निवृत्तीवेतनधारकास प्रत्येक वर्षी जीवीत प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. जीवीत प्रमाणपत्र सादर केलेले नसल्यास त्या निवृत्ती वेतन धारकास निवृत्ती वेतन प्रदान करण्याचे थांबवावे, असे नियम असतांना त्याप्रमाणे कार्यवाही केल्याचे तपासणी आढळून आलेले नाही.

३. नियम ८० अन्वये ज्या कुटूंब निवृत्तीवेतनधारकाचे निवृत्ती वेतन विवाहानंतर व पुनर्विवाहानंतर बंद होणार आहे. त्यांच्याकडून नमुना ए.पी.पी. १४ मध्ये दर सहामाहीस प्रतिज्ञापत्र मागविण्यांत येऊन ते डिसेंबर व जून मध्ये देय होणा-या निवृत्ती वेतन बिलासोबत जोडण्यांत यावे. असे प्रमाणपत्र देण्यात कसून झालेल्या प्रकरणांचे सविस्तर विवरण जानेवारी व जूलै महिन्यांत मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांचकडे सादर करणे आवश्यक असतांना त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.

४. निवृत्ती वेतन आदेशांत निवृत्ती वेतन धारकांचे फोटो, स्वाक्षरीचे नमुने, सुधारीत निवृत्ती वेतनाचे आदेश इत्यादी प्रकारचे अत्यावश्यक कागदपत्रे नस्तीबध्द केलेली नाहीत.

५. निवृत्ती वेतन बिल, निवृत्ती वेतन प्रदान आदेश व निवृत्त वेतन लेखा परीक्षा नोंदवहीतील नोंदी यामध्ये संदर्भिय नोंदवही क्रमांक, पृष्ठ क्रमांक यांची नोंद घेण्यात आलेली नाही. त्यामुळे संदर्भाकिंत लेखे तपासणीस लेखा परीक्षणात बराच कालावधी व श्रम व्यर्थ खर्च करावे लागत आहेत.

सदरचे नमुना ए.पी.पी. ९ व इतर अभिलेखे वेळीच पूर्ण न केल्याने योग्य प्रदाने झाल्याची पडताळणी लेखापरीक्षणांस करता आली नाही. या महत्त्वाच्या नोंदवह्या अपूर्ण ठेवणे ही बाब अतिशय गंभीर स्वरुपाची आहे. याबाबत संबंधित कर्मचारी व अधिकारी यांचेवर जबाबदारी निश्चित करावी.

उपरोक्त आक्षेपांबाबत अंतर्गत लेखापरीक्षणाकडून उचित पडताळणी करुन त्यांचा अहवाल व त्यावरील कार्यवाही अहवालासह निवृत्ती वेतन लेखा परीक्षा नोंदवही व सर्व आदेश नोंदवहीसह अद्ययावत पुर्तता लेखापरीक्षणांस दर्शवावी.

---

## परिच्छेद क्रमांक ३१ :- सेवापुस्तकातील अनियमितता.

पंचायत समिती, इगतपुरीचे सन २००७-२००८ चे लेखापरीक्षणाचे वेळी शिक्षण विभागातील सेवापुस्तकांची पडताळणी वेतन देयकाशी करतांना खालील अनियमितता आढळून आलेल्या आहेत.

१) शिक्षकांना देण्यात येणारे वेतन व सेवापुस्तकातील नोंद असलेले वेतन यात तफावत आढळून येते. त्याबाबत सोबत परिशिष्ट क्र. “ ५ ” जोडणेत आलेले आहे.

२) आदिवासी क्षेत्रात काम करणा-या शिक्षकांना एकस्तर वेतन निश्चितीचा लाभ देण्यात आलेला आहे. परंतु सेवापुस्तकात त्याची नोंद करुन खोडलेली आहे. त्यामुळे शिक्षकांना देण्यात येत असलेले वेतन बरोबर आहे किंवा कसे याची पडताळणी करता आलेली नाही.

३) तसेच आदिवासी क्षेत्रात काम करणा-या शिक्षकांकडून ते ज्या गावात कार्यरत आहेत त्याच गावात (मुख्यालयी) रहात असल्याचे प्रतिज्ञापत्र लेखापरीक्षणाचे वेळी पहावयास मिळाले नाही.

४) सन २००५ पासुन कुठल्याही सेवापुस्तकात वेतनवाढ व एकस्तर वेतन निश्चिती, चट्टोपाध्याय वेतन निश्चिती, रजा लेखा, घेतलेल्या रजा मंजूरी आदेश यावर गटशिक्षण अधिकारी यांच्या स्वाक्ष-या नाहीत तरीही सर्व शिक्षकांना वेतनवाढी व पदोन्नतीचे लाभ पूर्णतः देण्यात येत आहेत. नोंदी पूर्ण नसल्याने देण्यात येणारे वेतन व भत्ते बरोबर आहेत किंवा कसे याची पडताळणी करता आली नाही. (उदा. परिशिष्ठ ३ चे अ.क्र. ३४ ते ३६ पहा)

५) शिक्षण सेवक म्हणून नेमणूक केलेल्या शिक्षकांना नियमित वेतन श्रेणीत घेण्यांत आलेले आहे परंतु त्याबाबत सेवापुस्तकात नोंदी नाहीत किंवा गटविकास अधिकारी यांचे आदेश नाहीत. कांही शिक्षकांना नियमित शिक्षकांच्या म्हणजेच रुपये ४५००-१२५-९००० या वेतन श्रेणीत वेतन देण्यांत येत आहेत, परंतु त्याबाबत कुठलीही नोंद सेवापुस्तकात नाही (सेवापुस्तक कोरे आहे.).

६) ब-याचशा सेवापुस्तकांत रजेच्या नोंदी घेण्यात आलेल्या नाहीत. रजेचा हिशोब लिहीलेला नाही.

उपरोक्त अनियमिततां मूळे वेतन व भत्यांचे अती प्रदान होण्याची शक्यता नाकारता येत नाही सदर चूका टाळण्यांसाठी खालील नियमांचे पालन यापुढे होणे गरजेचे आहे.

महाराष्ट्र नागरी सेवा नियम सेवेच्या सर्वसाधारण अटी व शर्ती नियम १९८१ चे नियम क्र. ३५ ते ४९ नुसार प्रत्येक कार्यालयप्रमुखाने त्याच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील शासकीय कर्मचा-यांकडून साधारणपणे प्रत्येक वित्तीय वर्षात कमीत कमी एकदा सेवापुस्तकामधील नोंदी काळजीपुर्वक वाचल्या आहेत आणि त्या नोंदीबाबत त्याची खात्री पटली आहे अशा अर्थाचे प्रतिज्ञापत्र घेण्यात यावे असे प्रतिज्ञापत्र प्राप्त करुन घेतल्याबददलचा अहवाल कार्यालय प्रमुखांनी आपल्या वरीष्ठ अधिका-यास पाठवावा. तसेच कर्मचा-याने असे प्रतिज्ञापत्र देण्यापुर्वी इतर गोष्टींबरोबर त्या सेवांची यथोचितरीत्या पडताळणी केल्याबददलची व तसे प्रमाणीत केल्याबददलची खात्री करुन घ्यावी.

प्रत्येक कार्यालयातील सेवापुस्तकाची पडताळणी प्रत्येक वर्षाच्या मे महिन्यामध्ये कार्यालयप्रमुखाने करावी. कार्यालयप्रमुख वेतन देयके, वेतनपट आणि तत्सम अभिलेख यावरुन शासकीय कर्मचा-याच्या सेवेची पडताळणी मागील वित्तीय वर्षाच्या अखेरपर्यंत करण्यात आली आहे, अशा अर्थाचे एक प्रमाणपत्र सेवापुस्तकात नोंदविल. शासकीय कर्मचा-याच्या सेवापुस्तकामध्ये त्याच्या कार्यालयीन सेवेमध्ये घडणा-या प्रत्येक महत्त्वाच्या घडामोडीची म्हणजेच पदोन्नती, वेतनवाढी, बदल्या, रजा यांच्या नोंदी नियमितपणे घेणे आवश्यक आहे या नोंदी घेताना वेगवेगळे विभागीय आदेश, देयके, रजेचे आदेश पडताळून पाहणे आवश्यक आहे. उपरोक्त नमुद बाबींची परिपूर्ण पुर्तता करुन वेतन निश्चितीची लेखा अधिकारी यांचेकडून पडताळणी करुन पुर्तता लेखापरीक्षणास दर्शवावी.

---

**परिच्छेद क्रमांक ३२ :- सेवापुस्तक व निवृत्ती वेतन आदेश अप्राप्त असलेबाबत.**

पंचायत समिती, इगतपुरीचे ३ शिक्षणचे सेवापुस्तके व निवृत्तीवेतन आदेशाचे लेखापरीक्षण करतांना सोबत जोडलेले परिशिष्ट क्रमांक “ ६ ” व “ ७ ” मध्ये नमुद केलेल्या

शिक्षकांची सेवापुस्तके व निवृत्तीवेतन धारकांचे निवृत्तीवेतन आदेश लेखापरीक्षणास पहावयास मिळालेले नाही.

लेखाशिर्ष
३ शिक्षण
पंचायत समिती, इगतपुरी

---

**परिच्छेद क्रमांक ३३ :- वार्षिक लेखा नमुना नंबर २१ मध्ये नमुद जमा व खर्च रक्कमांच्या तफावतींबाबत.**

सन २००७ – २००८ साठी पंचायत समिती इगतपुरी यांचेकडील जिल्हा परिषदेस सादर केलेला वार्षिक लेखा नमुना नंबर २१ व जमा व खर्चाच्या नोंदवह्या नमुना नंबर १३ व १४ यांची पडताळणी केली असता खालीलप्रमाणे ताळमेळ जुळत नसल्याचे आढळून आले.

१) लेखाशिर्ष २२३६ – पोषण आहाराच्या नमुना नंबर २१ मध्ये दर्शविलेला एकूण खर्च व नमुना नंबर १४ मध्ये दर्शविलेला एकूण खर्च एकत्रितरित्या जुळत असला तरी योजनानिहाय जुळत नाही. उदा. नमुना नंबर १४ मध्ये २२३६००६३ या लेखाशिर्ष संकेतांकाखाली रुपये ६,४९,९५०/- खर्च दर्शविला असतांना नमुना नंबर २१ मध्ये २३६००६३ या लेखाशिर्ष संकेतांकावर खर्च निरंक दर्शविला आहे.

२) लेखाशिर्ष २४०१ पीक संवर्धन अंतर्गत नमुना नंबर २१ मध्ये खर्च रु. ९,९१,७१२/- दर्शविला आहे. प्रत्यक्षात नमुना नंबर १४ मध्ये दर्शविलेला एकूण खर्च रुपये ७,२१,७१२/- इतकाच नोंदविण्यात आलेला आहे.

३) लेखाशिर्ष ४५१५ स्थानिक विकास कार्यक्रम अंतर्गत नमुना नंबर २१ मध्ये रुपये २,००,०००/- खर्च दर्शविला आहे. प्रत्यक्षात सदर खर्चाची नोंद नमुना नंबर १४ मध्ये आढळून येत नाही.

४) ठेव सदरी माहे मार्चची जमा रक्कम रुपये २५,३१,७८१/- व सन २००७ – २००८ ची एकूण जमा रक्कम रुपये ३,०९,९०,१७२/- नमुना नंबर २१ मध्ये दर्शविली असतांना नमुना नंबर १३ नुसार ती अनुक्रमे रुपये २२,३६,७४९/- व रुपये ३,०५,९७,६४०/- दर्शविली आहे.

उपरोक्त नमुद तफावतीचा मेळ घेऊन सुधारीत नमुना नंबर २१ जिल्हा परिषदेस सादर करुन व बरोबर असल्याचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांचे प्रमाणपत्र आणि सदर अनियमिततेस त्यांचे क्षमापन प्राप्त करुन अनुपालन दर्शवावे.

---

**परिच्छेद क्रमांक ३४ :- उप – विभाग (इ व द) इगतपुरी यांचेकडील नमुना नंबर ३९, ४० व ४१ बाबत.**

उप – विभाग इगतपुरी (इ व द) यांनी कार्यालयात नमुना नंबर ३९, ४० व ४१ दप्तरी ठेवलेले आहेत. सदरच्या नोंदवह्या तपासणी केली असता त्यात खालील अभिप्रायानुसार त्रुटी आहेत.

अ) नमुना नंबर ३९ :- उपविभागाने सन ३१.३.२००४ पर्यंतच्या नोंदी नमुना नंबर ३९ मध्ये नोंदविलेल्या आहत. सन २००४ – २००५ पासुनच्या नोंदी नाहीत त्यामुळे सन २००४ – २००५ ते २००७ – २००८ या कालावधीत जी नविन इमारतीची कामे उपविभागामार्फत पूर्ण केली आहेत. त्यांच्या नोंदी कां नमुद करण्यात आल्या नाहीत. याबाबत खुलासा होणे आवश्यक आहे. त्यामुळे जिल्हा परिषद व त्याअनुषंगाने शासनाचा निधी व्यर्थ जाण्याची शक्यता नाकारता येत नाही. यावरुन सहाय्यक अभियंताच उपविभाग, इगतपुरी हे त्यांनी त्यांची जबाबदारी पारपाडीत नसल्याचे स्पष्ट दिसून येते.

ब) नमुना नंबर ४० :- फक्त १७९ रस्त्यांच्या नोंदी नमुद आहेत. नोंदवहीतील आवश्यक रकाने निरंक नमुद आहेत.

रकाना क्रमांक ८ :- काम पूर्णत्वाचा दिनांक नमुद नाही.

रकाना क्रमांक ९ :- सरासरी प्रती किलोमीटरचा खर्च नमुद नाही.

रकाना क्रमांक १० :- प्रत्येक किलोमीटरचा दुरुस्तीसाठी केलेला खर्च नमुद नाही.

रकाना क्रमांक ११ :- उप - अभियंता इगतपुरी यांनी नोंदी तपासून स्वाक्षरी केलेली नाही.

क) नमुना नंबर ४१ :- सदरच्या नोंदवहीत मोकळ्या जागांच्या नोंदी नमुद आहेत. परंतु मोकळ्या जागांचे ७/१२ उतारे व नमुना नंबर ८ ड चे उतारे दरवर्षी महसूल विभागाकडून प्राप्त करुन घेण्यात आलेले नाहीत.

प्रदीर्घ कालापासून ७/१२ उतारे महसूल विभागाकडून प्राप्त न करुन घेतल्याने नमुना नंबर ४१ वर जे क्षेत्र मोकळ्या जागोचे नमुद आहे. त्या प्रमाणेच क्षेत्र आहे. याबाबत लेखापरीक्षणास खात्री करता आली नाही. तसेच जिल्हा परिषदेच्या जागेवर अतिक्रमण झाले किंवा इतर कारणास्तव सदरच्या जागेचा दुरुपयोग केला किंवा कसे याबाबत ७/१२ उतारे उपलब्ध न झाल्याने सत्य माहिती प्राप्त झाली नाही.

उपरोक्त अभिप्रायातील उणीवांची पुर्तता करुन अनुपालने दर्शवावे.

---

## परिच्छेद क्रमांक ३५ :- आक्षेप विवरणपत्र

लेखापरीक्षणांत आढळून आलेल्या किरकोळ स्वरुपाच्या आक्षेपांची पुर्तता लेखापरीक्षण कालावधीत करुन घेतल्याने आक्षेप विवरणपत्र निर्गमीत करण्यात आलेले नाही.

---

## परिच्छेद क्रमांक ३६ :- लेख्यांची स्थिती.

लेख्यांची स्थिती असमाधानकारक असून लेखे सुधारण्यास वाव आहे.

---

## परिच्छेद क्रमांक ३७ :- वार्षिक लेखे.

या लेखापरीक्षण अहवालातील आक्षेपांचे संपूर्ण पूर्ततेस अधिन राहून व निवडक महिन्यांशिवाय इतर महिन्यांतील जमा खर्चामध्ये कुठलीही गंभीर अनियमितता अंतर्गत

लेखापरीक्षणामध्ये आढळून आलेली नाही याआधारे पंचायत समितीचे सन २००७ - २००८ चे लेखे बरोबर आढळून आले आहेत, असे नमुद करण्यात येत आहे.

---

**परिच्छेद क्रमांक ३८ :- अनुपालन व पोहोच.**

मुंबई स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम १९३० चे कलम १०(१) प्रमाणे, प्रस्तुत लेखापरीक्षण अहवालांतील आक्षेपांचे अनुपालन, चार महिन्यांचे आत पंचायत समितीच्या ठरावाच्या प्रतिसह तीन प्रतीत मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नाशिक यांचे स्वाक्षरीने पाठविण्यांत यावे, तसेच अहवाल प्राप्त झाल्याचा दिनांक कळवून पोहोच दयावी.

(वि. ए. कोते)
उपमुख्य लेखा परीक्षक
स्थानिक निधी लेखा,नाशिक

**प्रत सविनय सादर**

१) मा. सचिव, ग्रामविकास विभाग, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई (पत्राने)
२) मा. महालेखापाल, बाहय लेखा परीक्षण विभाग, मुंबई
३) मा. आयुक्त, नाशिक विभाग, नाशिक
४) मा. मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, नवी मुंबई
५) मा. सहमुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा, नाशिक विभाग, नाशिक

**प्रत सस्नेह अग्रेषित :-**

१) म. उपमुख्य लेखा परीक्षक (पंचायत राज समिती), स्थानिक निधी लेखा, मुंबई
२) म. गटविकास अधिकारी (उच्च श्रेणी), पंचायत समिती इगतपूरी, जिल्हा नाशिक

उपमुख्य लेखा परीक्षक
स्थानिक निधी लेखा, नाशिक